बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १० | बुधवार,दि.१५ फेब्रुवारी २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# बग्गा प्रकरणात टेंडर लिपीकासह अधिकाऱ्यांची कधी होणार चौकशी?

## शपथपत्राकरिता आमगाववरुन विकत घेतले गेले स्टॅम्प पेपर

## माहिती लपविल्याप्ररणी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ



**गोंदिया:-** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातंर्गत गेल्या अनेक महिन्यापासून चर्चेत असलेल्या कंत्राटदार पी.ए.बग्गा प्रकरणात नवी माहिती समोर आली असून गोंदिया निवासी कंत्राटदार पी.ए.बग्गा यांच्यावतीने मुलगा एस.पी.ए.बग्गा या नावे सादर करण्यात आलेला वारसदारसबंधी शपथपत्राकरीता वापरण्यात आलेला स्टॅम्पपेपर हा २१ जानेवारी २०२१ गुरुवारला आमगाव येथील मुद्रांक विक्रेता प्रमोदकुमार तिरपुडे यांच्याकडून विकत घेतला गेलेला आहे.विशेष म्हणजे ज्या दिवशी स्टॅम्प आमगाव येथून खरेदी करण्यात आले,त्यादिवशी गोंदियातील स्टॅम्पव्हेंडरकडे खरंच स्टॅम्पपेपरचा तुडवडा होता काय अशाही प्रश्न या माध्यमातून उपस्थित झालेला आहे.

त्या स्टॅम्पपेपरवर वारसदारसबंधी शपथपत्र लिहून गोंदिया येथे ५ फेबुवारी २०२१ नोटरी करण्यात आले.त्यानंतर १९ फेबुवारीला पी.ए.बग्गा यांचे निधन झाले.या शपथपत्रावर असलेल्या दोन्ही स्वाक्षरीचे निरिक्षण केल्यास सारख्याच दिसून येतात.विशेष म्हणजे जो कंत्राटदार व्यक्ती शासकीय कामाकरीता विद्युत बांधकाम विभागात नोंदणी करतो,ती नोंदणी त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर लगेच रद्द होते.परंतु या प्रकरणात कंत्राटाचे कार्यारंभ आदेश मृत्यूनंतर एक वर्षांनी म्हणजे १७ मार्च २०२२ ला देण्यात आले.यामुळे याप्रकरणात खोटे कागदपत्र जोडणारा व्यक्ती जेवढा दोषी दिसून येतो,तेवढेच दोषी या विभागातील अधिकारी कर्मचारी सुध्दा दिसून येत आहेत,त्यांना या बाबी कळल्या नाही का हा सुध्दा प्रश्न निर्माण झाल्याने सखोल चौकशीची गरज निर्माण झाली आहे.

पीए बग्गा फर्मला १७ मार्च २०२२ रोजी ०.११ टक्के कमी दराच्या निविदा मंजूर करुन ८ कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले.जेव्हा की या फर्मचे संचालक पी.ए.बग्गा यांचा मृत्यू हा १९ फेबुवारी २०२१ रोजीच झालेला आहे.मृत्यूनंतर कंत्राटदाराची नोंदणी रद्द होते.मृत्यू २०२१ मध्ये झालेला असताना २०२२ मध्ये म्हणजे १ वर्षानंतर त्या कामाचे कार्यारंभ आदेश देतांना सबंधित बांधकाम विभागाच्या प्रमुखासह टेंडर लिपिकाच्या लक्षात ही बाब का आली नाही.की त्यांनी याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन या अनियमिततेला संधी दिली याची सखोल चौकशी करण्याच गरज आत्ता निर्माण झाली आहे.

**याप्रकरणात संबधित मृत कंत्राटदाराच्या वारसदाराला पत्र देऊन खुलासा मागवूनही महिनो कालावधी होत असताना प्रशासन याप्रकरणात कुठे तरी चुकत असल्यामुळे विभागीय आयुक्तांनी या प्रकरणात स्थानिक मुख्य कार्यकारी अधिकारी वगळून बाह्य जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी मार्फत चौकशी अधिकारी नेमणे गरजेचे झाले आहे.**कारण ज्या शपथपत्राच्या आधारे पी.ए.बग्गा यांच्या मुलाने सर्व शासकीय कामे पार पाडण्याकरीता मुख्य फाईल बांधकाम विभागातून आपल्या ताब्यात घेत कागदपत्रांची अदलाबदल केल्यामुळेच स्वाक्षरीत बदल दिसून येत आहे.याचा अर्थ संबधित टेंडर क्लर्क किंवा कुणीतरी प्रशासकीय कर्मचारी अधिकारी याप्रकरणात कागदपत्र देण्याकरीता सहकार्य केल्याशिवाय एवढे मोठे प्रकरण होऊच शकत नसल्याचे बोलले जात आहे.

**राज्यातील शिंदे फडणवीस सरकार हे भ्रष्टाचार व गैरव्यवहार खपवून न घेणारे सरकार असल्याने व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हे कडक असल्याचे बोलले जाते.हे सर्व याप्रकरणात दोषी बांधकाम विभागाचे प्रमुख अधिकारी व संबधित लिपिकाची चौकशी करण्यासाठी पुढाकार घेणार काय अशा सवाल आत्ता जिल्हा परिषदेत चर्चेला आला आहे.**

सुमारे ८ लाख रुपये किमतीचे ८ काम बग्गा यांच्या फर्मला आफलाईन निविदा पध्दतीने मिळाले होते.विशेष म्हणजे एकाच कंत्राटदाराला ३ च्या वर कामे एका निविदाप्रकियेवेळी देता येत नसताना बांधकाम विभागाच्या प्रमुखांनी ८ कामे कुठल्या आधारावर दिले हाच तपासाचा खरा मुद्दा आता समोर येत आहे.त्यातच फर्मच्या संचालकाच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्वाक्षरीत शासकीय कागदपत्रावर झालेली हेराफेरी ही ४२० चा गुन्ह्यासारखी घटना असल्यामुळेच सीईओ यांनी चौकशीचे आदेश दिले होते.

त्यानुसार मृताच्या वारसदारासह नगरपरिषदेने आपले उत्तर बांधकाम विभागाकडे सादर केल्याची माहिती समोर आली आहे.त्यानंतरही चौकशीला उशीर का होत आहे.त्यातच या निविदा प्रक्रियेचे सर्व कागदपत्र सांभाळणारा लिपिक हा सुध्दा तेवढाच दोषी का नाही.लिपिकाकडून फाईल कुठल्या तरी कारणाने फर्मच्या वारसदाराकडे पोचली आणि त्यानंतरच करारनाम्यावरील स्वाक्षरीत बदल झाला हे सत्य नाकारता येत नाही.

ऑफलाईनमध्ये दिलेल्या कामात भरनोली,उपकेंद्र खोबा,मुंढा,उपकेंद्र खेडेपार,डोंगरगाव डेपो,धापेवाडा,झाशीनगर,करटी बु. येथील कामाकारीता पी.ए.बग्गा कॉन्ट्रक्टर एण्ड सप्लायर यांना निविदा मंजुर करण्यात आली होती.या सगळ्या कामावर मिळालेल्या माहितीनुसार अंदाजे ०.०९ ते ०.११ टक्के कमी दराने निविदा सादर केले होते.निविदा सादर करतेवेळी आयकर विभागाचे चालू आर्थिक वर्षाचे प्रमाणपत्र न जोडता १९-२० या वर्षाचे जोडण्यात आले. त्यामुळे निविदा प्रकिया ज्यांच्या मुख्य देखरेखीत पार पडते. त्या बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी ४ मार्च २०२२ रोजी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कक्षात तडजोड करण्यासाठी सदर कंत्राटदाराला बोलावले होते.त्यावेळी अती.मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंत्या यांच्या लक्षात एकाच कंत्राटदाराला ३ पेक्षा अधिक कामे गेल्याचे कसे आले नाही.की येऊनही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे.

ज्या कंत्राटदार फर्मच्या संचालकांना तडजोडीकरीता बोलावण्यात आले होते.ते संचालक प्रितपालसिंग अमलिकसिंग बग्गा यांचा मृत्यू १९ फेबुवारी २०२१ रोजी झाल्याची नोंद ३ मार्च २०२१ रोजी नगरपरिषद गोंदिया येथे करण्यात आली आहे.त्यासंदर्भातील मृत्यू प्रमाणपत्र १७ ऑगस्ट २०२२ रोजी नगरपरिषदेने जारीही केले. जर सदर व्यक्ती मार्च २०२१ मध्ये मृत्यू झाला असेल तर मार्च २२ मध्ये त्यांच्या नावावर हजर राहिलेली व्यक्ती कोण आणि त्या व्यक्तीने सादर केलेले काम बघण्यासाठीचा हलफनामा हा एक ते दिड वर्ष प्रशासनापासून का लपविला.ज्या तारखेला हा फर्मच्या संचालकाने वारसदारासाठी दिला त्या तारखेच्या काही दिवसात कार्यालयीन कागदपत्रात तो न जोडता तडजोडीच्या पत्राची वाट का बघण्यात आली,असे प्रश्न उपस्थित झाले असून या प्रकरणात शासनाची फसवणूक करण्यात फर्मच्या संचालकासोबतच कार्यालयातील कर्मचारीवर्गही तेवढाच दोषी दिसून येत आहे.

पी.ए.बग्गा यांनी जि.प.बांधकाम विभागाकडे निविदेकरीता जेव्हा कागदपत्र सादर केले आणि त्यानंतरच्या कागदपत्रातील स्वाक्षरी आणि तडजोडीकरीता मिळालेल्या दोन पत्रामधील स्वाक्षरीत स्पष्ट फरक दिसून येते.सोबतच सबंधित शासकीय विभागाला फर्मचे संचालक मृत्यू झाल्याचे का कळविण्यात आले नाही हाच सर्वात मोठा मुद्दा आहे. पी.ए.बग्गा यांची जीएसटी नोंदणी ही १४ ऑक्टोंबर २०१९ ला झाली.आणि जीएसटीची नोंदणी १९ फेबुवारी २०२१ ला रद्द झालेली असतानाच करारनाम्यावर जीएसटीची प्रत कशी जोडण्यात आली हे चौकशीचा विषय ठरला असून १२ टक्के जीएसटीची रक्कम ९ लाख रुपये वित्त व बांधकाम विभागाने चौकशी न करता कुठल्या आधारावर दिली हा सुध्दा चौकशीचा विषय झालेला आहे.

# भंडारा, गोंदियाचे पणन अधिकारी निलंबित

**गोंदिया:** धान केंद्र वाटप, भरडाईत तफावत, संस्थांची तपासणी न करणे आदी कारणांमुळे धान घोटाळे होत असतानाही फक्त कागदोपत्री कारवाई करणाऱ्या भंडारा आणि गोंदियाच्या जिल्हा पणन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. भारतभूषण रमेश पाटील (भंडारा) व मनोज बाजपेयी (गोंदिया), अशी निलंबित अधिकाऱ्यांची नावे आहेत. गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, सालेकसा व गोरेगाव तालुक्यातील धान खरेदी संस्थांना डीओ देतांना केलेला उशीर आणि खरेदी केलेल्या धानापेक्षा कमी उचल करण्याचे दिलेले डीओ आदी प्रकरणातील चौकशीदरम्यान जिल्हा पणन अधिकारी मनोज बाजपेयी हे दोषी आढळून आले.त्यातच १६ हजार क्विंटलची घट असताना ८ हजार क्विंटलची घट दाखविणे,संस्थेची अनामत रक्कम न घेणे आदी बाबींत हलगर्जीपणा केल्याचा ठपका बाजपेयी यांच्यावर ठेवण्यात आलेला आहे.



भंडारा जिल्ह्यात सुरुवातीला १०० कोटींचा धान घोटाळा उघडकीस आला होता. सीआयडी तपासानंतर हे प्रकरण आता न्यायप्रविष्ठ आहे. त्यानंतर भंडारा जिल्ह्यात धान घोटाळ्याची मालिकाच सुरू झालेली आहे. जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी धान खरेदी आणि भरडाईत तफावत असतानासुद्धा सदर संस्थांचा कोणताही पूर्व इतिहास तपासला नाही. जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी त्या संस्थांवर कोणतीही कारवाई केली नाही. तुमसर तालुक्यातील पिपरा येथे हजारो गोणी धानसाठा पुरात वाहून गेल्याचे प्रकरण पुढे आले होते. परंतु, त्याठिकाणी धानसाठा शिल्लकच नसल्याचे दिसून आले आहे. या संपूर्ण प्रकरणात जिल्हा पणन अधिकारी पाटील यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. त्यांच्या अशा भूमिकेमुळे जिल्हा पणन महामंडळाचे कोट्यवधीचे नुकसान झाले असून हलगर्जीपणा आणि दिरंगाई करणाऱ्या संस्थांना गैरव्यवहार करण्यास वाव मिळाला, असा ठपका ठेवण्यात आला आहे.

### अनियमितता भोवली

भंडारा जिल्ह्यातील किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हंगाम २०२१-२२ मध्ये धान खरेदी संस्थांना धान खरेदीचे काम देताना संबंधित संस्थांकडून प्रत्येकी १० रुपये अनामत रक्कम आणि ५० लाख रुपये रकमेचा बोजा घेतला नसल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे पणन महासंघाचे २०,२६,३७,३२६ इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसन झालेले आहे. याशिवाय संबंधित आठ खरेदीदार संस्थांकडून धान खरेदी करताना झालेल्या अनियमितेमध्ये पणन महासंघाचे २८ कोटी ३९ लाख ३१ हजार ३६५ रुपयाचे नुकसान झाले आहे.

# धान उत्पादकांच्या बोनसकरीता १ हजार कोटीच्या निधीला मंत्रिमंडळाची मंजूरी

**मुंबईः-** राज्य मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडण्यात आला. शासनाला मार्गदर्शन केल्याबद्दल हा प्रस्ताव मांडण्यात आला. यावरून विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी १ हजार कोटी निधीस मान्यता देण्यात आली असून, या निर्णयाचा ५ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.महाराष्ट्रातील शाळांचे पूर्ण स्वरूपच बदलणार असून केंद्र सरकारची पीएमश्री योजना राज्यात देखील लागू करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांच्या मागण्यासांठी राष्ट्रवादीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**गोंदिया-**गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने शेतकऱ्यांच्या विविध मागण्याचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी मार्फत पाठविले.त्यामध्ये जिल्हयात शासनाच्या हमी भाव योजने अंतर्गत महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळा मार्फत खरेदी करण्यात येत असलेल्या खरीप हंगामातील धान खरेदीची उद्दिष्ट वाढवुन देत शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावे. खरीप हंगामातील धानाची लागवड व कृषी विभागांनी निश्चित केलेली उत्पादन क्षमतेला अनुसरून जिल्हयाला सुमारे ५० लक्ष क्विंटल खरेदी उद्दिष्ट अपेक्षित होते. परंतु जिल्हयाला फक्त ३९ लक्ष क्विंटल उद्दिष्ट देण्यात आले. तसेच जिल्हयातील शेतकऱ्यांनी ई पीक नोंदणी केली पण अनेक शेतकऱ्यांच्या ७/१२ ला नोंद झालेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर अत्यंत कमी दराने धान विक्री करण्याचा प्रसंग ओढवल्याचे म्हटले आहे.

शासनाने काही दिवसापूवी धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर केले. परंतु सदर बोनस सरासरी एकरी ३७५ रुपये मिळणार असून एक प्रकारची शेतकऱ्यांची थट्टा आहे.या दोन वर्षात रासायनिक खताचे, किटकनाशकाचे, मजुरीचे व डिझेलचे भाव गगणाला भिडले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० रुपये धानाला बोनस देण्यात यावे.

शिष्टमंडळात माजी आमदार राजेन्द्र जैन,जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर,नरेश माहेश्वरी,राजलक्ष्मी तुरकर,डॉ.अविनाश काशीवार,सी.के.बिसेन,केतन तुरकर,सुनील पटले,शैलेश वासनिक,नागरतन बन्सोड,आरजू मेश्राम, कपिल बावनथडे, योगी येडे, रौनक ठाकूर सहित अन्य उपस्थित होते.



# ४८ हजार शेतकऱ्यांचे ३३३ कोटी रखडले

### उद्दिष्ट पुर्तीसाठी खरेदीला मुदतवाढ

**जिल्ह्यात यंदा उशिराने धान खरेदीला सुरुवात झाली. त्यातच विविध तांत्रिक अडचणींमुळे खरेदीत बाधा आली. परिणामी जिल्ह्याला दिलेले ३७ लाख ३०० क्विंटलचे उद्दिष्ट ३१ जानेवारी या मुदतीत पूर्ण झाले नाही. नोंदणी केलेल्या १ लाख १५ हजार ८३६ शेतकऱ्यांपैकी सुमारे १२ हजार पेक्षा अधिक शेतकरी धान विक्रीला मुकले. यानंर लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शासनाने १५ फेब्रुवारीपर्यंत शासकीय धान खरेदीला मुदतवाढ दिली आहे.**

### १६ टक्केच धान भरडाई

**धान भरडाईसाठी २९७ राईस मिलर्सनी करारनामे केले. पैकी २०७ मिलर्सकडून धान भरडाई सुरुआहे. आतापर्यंत खरेदी करण्यात आलेल्या धानापैकी केवळ १६ टक्केच धान भरडाई झाली आहे. वेळेत भरडाईचे काम पूर्ण झाल्यास मेमध्ये सुरू होणाऱ्या उन्हाळी हंगामातील धान खरेदी प्रभावित होऊ शकते, ते हे मात्र तितकेच खरे.**

**गोंदिया:** जिल्ह्यातील धान उत्पादक ४८ हजार शेतकऱ्यांचे तब्बल ३३३ कोटी रुपये थकले आहेत. धान विक्रीनंतर सात दिवसांत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात यावी, असे निर्देश असताना महिन्याभरानंतरही शेतकऱ्यांना धान विक्रीची रक्कम मिळाली नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

गोंदिया जिल्ह्यामध्ये गैरआदिवासी भागात जिल्हा मार्केटिंग कार्यालयाच्या उपअभिकार्ता संस्थांमार्फत शासकीय धान खरेदी करण्यात येते. ते यंदाच्या खरीप हंगामात जिल्हा पणन कर्यालयाच्या ११५ केंद्रावरून ३१ जानेवारी या मुदतीत नोंदणी केलेल्या १ लाख १५ हजार ८३६ शेतकऱ्यांपैकी पै १ लाख ३ हजार ७९० शेतकऱ्यांनी ३७ लाख १९ हजार १६२ क्विंटल धान विक्री केले. पैकी पै ५५ हजार ७५३ शेतकऱ्यांना ४२५ कोटी ६३ लाख ९९ हजार ६५६ रुपयाची रक्कम देण्यात आली असली तरी अद्यापही ४८ हजार ३७ शेतकऱ्यांना ३३३ कोटी ६ लाख ९२ हजार ८८ रुपये देणे बाकी आहे.

धानाचे उत्पादन निघाल्यानंतर मिळणाऱ्या पैशातून शेतकरी त्यांनी घेतलेले कर्ज फेडण्याचा विचार करतो. मात्र, धान विकून महिना लोटूनही पैसे न मिळाल्यामुळे शेतकरी चांगलाच आर्थिक अडचणीत सापडला आहे. बऱ्याचदा या अडचणींचा सामना करावा लागू नये. म्हणूनणू शेतकरी व्यापाऱ्यांना कमी किंमतीत त्यांचा धान विकतो. तर जो शेतकरी शासकीय आधारभूतभू धान खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी आणतो. त्या शेतकऱ्यांची वेगवेगळ्या पद्धतीने फसवणूक होण्याच्या तक्रारींमध्येही वाढ झाली आहे.

याविषयी जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांना विचारले असता, शासनाकडून टप्प्याटप्प्याने निधी मिळतो, त्यानुसार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नियमानुसार शेतकऱ्यांचे पैसे आठवडाभरात मिळायला हवेत. मात्र, अनेक शेतकऱ्यांचे पैसे मिळाले नाही. या संदर्भात आपल्याला तक्रारी फक्त झाल्या असून आपण शासनाकडे राखण्यासाठी पाठपुरावा केला असून लवकरच रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे आमदार विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

# महिना भरात नुकसानभरपाई मिळावी यासाठी कायदा करू-मुनगंटीवार




## तिरोड्यात महाआरोग्य शिबिर, ११ कोटींच्या विकास कामाचे भूमिपूजन

**तिरोडा :** रानडुकर व इतर वन्यप्राण्यांच्या उपद्रव्याने शेतपिकांचे प्रचंड नुकसान होते. याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसतो. शेतकऱ्यांना आर्थिक हातभार देण्यासाठी शासनाने नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ केली आहे. नुकसानग्रस्ताना मिळणारी वाढ ही अल्पच आहे. नुकसान भरपाई दुप्पट मिळावी आणि तिही महिना भरात मिळावी यासाठी येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कायदा करू, अशी ग्वाही राज्याचे वन व सांस्कृतिक मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. ते आमदार विजय रहांगडाले यांच्यातर्फे रविवार १२ फेब्रुवारी रोजी आयोजित महा आरोग्य शिबिर, ग्रापं पदाधिकारी, आशा सेविकांचा सत्कार व ११ कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर, खा.सुनिल मेंढे, जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, भाजयुमो अध्यक्ष ओम कटरे, बांधकाम सभापती संजय टेंभरे, माजी आमदार हेमंत पटले, खोमेश्वर रहांगडाले, बाळा काशीवार, भजनदास वैद्य, पंस सभापती कुंता पटले, उपसभापती हुपराज जमईवार आदींसह मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.

पुढे मुनगंटीवार म्हणाले, आता खऱ्या अर्थाने राज्यात जनतेचे प्रश्न सोडवणारे सरकार आले आहे. आपण शेतकऱ्यांची भावना जानतो,येत्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत कृषी पंपासाठी दिवसा १२ तास वीज पुरवठा करण्या संदर्भात निर्णय घेऊ. दिला शब्द पुर्ण करणे आमची संस्कृती आहे. अर्थसंकल्पात निधीची तरतूद करून धान उत्पादकांना बोनस देऊ. पानी असेल तर शेतकरी राजा सोनं पिकवेल, यासाठी निमगाव प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून येथील सिंचनाची समस्या दूर सारू आरोग्य शिबिरांच्या माध्यमातुन गोरगरिब जनतेच्या अनेक व्याधिंचे निदान करून उपचार व औषोधोपचार केला जातो.

यावेळी त्यांनी प्रत्येक गरजूपर्यंत आरोग्य कार्ड पोहचविण्याचे आवाहन केले. आ.विजय रहांगडाले यांचे कार्य नक्कीच कौतुकास्पद असून रहांगडाले यांनी आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबिराची स्तुती मुनगंटीवारांनी केली. यावेळी त्यांनी येत्या मंत्रीमंडळच्या विस्तारात जिल्ह्याच्या विकासाठी रहांगडाले यांना २५ टक्के मंत्री पदाची खात्री ही व्यासपीठा वरून दिली. प्रसंगी आशा सेविका ग्रापं पदाधिकारी यांचा उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी इतर पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला.

### नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला मिळणार वाघ

**गोंदिया-भंडारा जिल्ह्याचे वैभव असलेल्या नवेगाव-नागझिरा अभयारण्यात व्याघ्र दर्शनासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. मात्र व्याघ्र दर्शन होत नसल्याने त्यांची निराशा होते. यामुळे येथील पर्यटक संख्या ही रोडावली आहे. ही बाब खा.मेंढे यांनी मुनगंटीवार यांच्या लक्षात आणून दिली. या नंतर नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला वाघ-वाघिणीचे जोडपी देणार आणि महिना-दोन महिन्यात खा.मेंढे,आ.रहांगडाले यांच्या हस्ते पिंजऱ्याचे व्दार उघडू असे सूतोवाच मुनगंटीवार यांनी केले.**



# हॉकर्स झोनचा विषय रेंगाळला




### चार मजली झोन

**नगरपालिकेच्या समोर पालिकेच्या मालकीची चार एकर जागा आहे. त्याठिकाणी सध्या बाजार लुगतो. या जागेवरील विक्रेत्यांना हटवून त्याठिकाणी चारमजली हॉकर्स झोन तयार करण्यात येणार आहे. त्या हॉकर्स झोनमध्ये दुकाने हवी असलेल्यांकडून रक्कम घेण्यात येणार आहे.**

**गोंदिया:** शहरातील फेरीवाल्यांना त्यांच्या हक्काची जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शहरातील दुकानांचे सर्वेक्षण करण्यात आले. नगरपालिकेसमोर असलेल्या बाजारातील जागेत चार मजली इमारत तयार करुन त्याठिकाणी हॉकर्स झोन तयार करण्यात येणार होते. मात्र, दोन वर्षाचा कालावधी लोटून देखील त्यावर कारवाई झाली नाही. बाजार उठविण्याला विरोध होत असून मतांचे राजकारण बिघडू नये, यासाठी हा विषय रेंगाळत ठेवला असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

गोंदिया शहरात मिळेल त्या ठिकाणी टपऱ्या आणि इतर दुकाने टाकून व्यवसाय कणाऱ्यांची मोठी संख्या आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथडा निर्माण होतो. यावर उपाययोजना म्हणून शहरातील दुकानांचे सर्वेक्षण करुन त्यांना स्थायी स्वरूपात दुकाने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वेक्षणाकरिता शासनाने नगरपालिकेला १ लाख ९० हजारांचा निधी मंजूर केला. शासनाच्या या योजनेंतर्गत फेरीवाल्यांकरिता हॉकर्स झोन तयार करण्यात येणार असून त्याकरिता उपाययोजनांना सुरुवात करण्यात आली. वर्षभरापुर्वी ऑनलाईन सर्वेक्षण देखील करण्यात आले.

सर्वेक्षणाचे काम एका संस्थेला देण्यात आले. सर्वेक्षणाच्या आधारे फेरीवाल्यांची यादी तयार केली जाणार असून या यादीत ज्या फेरीवाल्यांचा समावेश असेल अशांना हॉकर्सझोन मध्ये दुकान उपलब्ध करून दिले जाणार होते.

हे काम अधिक प्रभावीपणे व्हावे, या उद्देशाने अस्थायी कमिटीची स्थापना करण्यात आली. या कमिटीत शहरातील विविध भागातील नागरिकांना प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. हॉकर्स झोनकरिता दुकाने देण्यात येणार असून त्याकरिता फेरीवाल्यांना रक्कम जमा करावी लागणार आहे. फेरीवाले शहरातील गल्ली बोळात जाऊन साहित्याची विक्री करतात. मात्र त्यांना आता एकाच ठिकाणी स्थायी दुकान थाटून साहित्याची विक्री करावी लागणार आहे. अत्यंत चांगला प्रकल्प असताना देखील या प्रकल्पाची गती मंदावली. त्यामुळे राजकीय मंडळीच आपली मते बिडघू नये, यासाठी प्रकल्पाला विलंब करण्यात येत आहे.

## संपादकीय

# भागवतांच्या शाब्दीक खेळाच्या जाळ्यात फसलेला बहुजन!

ब्राह्मणाचे चरित्र कायम लवचिक आणि अवसरवादी राहिले आहे.या देशात ज्यांची ज्यांची आक्रमणे झालीत (तसे आर्य ब्राह्मणाने सुद्धा साडे तीन चार हजार वर्षांपूर्वी भारतावर आक्रमण केले आहे.आर्य ब्राहण विदेशी आहेत.) त्यांच्या सोबत सलगी ठेवून त्यांनी आपली सत्ता कायम ठेवली. या देशात पोर्तुगीज, डच, मुस्लिम आणि नंतर इंग्रज आलेत. यांच्यासाठी याच ब्राह्मणांनी पायघड्या अंथरल्यात. 'तुम्ही या, राज्य करा आणि त्या राज्यात कुठेतरी आम्हालाही स्थान द्या. तुम्हीच आमचे मायबाप'. अशी समरसतेची भूमिका घेत त्यांनी लाचारी स्वीकारत आपली बाजू हळूहळू मजबूत केली.आपल्या विकासात जर कोणी येत असेल तर त्याच्या विरोधात शस्त्र उचलण्याचाही त्यांनी कपटी डाव खेळला.हे सिद्ध करण्यासाठी पुष्यमित्र श्रुंग आणि कृष्णाजी भास्कर कुलकर्णी ही दोन उदाहरणे या ठिकाणी पुरेशी आहेत. हा वर्ग काळानुसार आपले साधन-संसाधन बदलतो, आपला उद्देश नाही. उद्देश पूर्तीसाठी तो काहीही करायला तयार असतो.तो जे करतो त्यामध्ये उद्देशाबरोबरच इतरांसाठी रचलेले षडयंत्र असते, एक जाळे टाकलेले असते.

नुकताच संत रविदास जयंती निमित्त आरएसएसचे संघ संचालक मोहन भागवत यांनी जाती पंडितांनी निर्माण केल्याचे आपल्या भाषणात सांगितले. यावर सोशल मीडिया आणि वृत्तपत्रात नेहमीप्रमाणे चर्चेला उधाण आले. मुळात वृत्तपत्रातील बातम्या ह्या जाणीवपूर्वक पेरल्या जातात. जो सत्ताधारी असतो त्यांच्या त्या बाजूच्या असतात. मीडियाने तटस्थ आणि निर्भीडपणे आपली भूमिका वटवायची असते. मात्र ही नैतिकता आता मीडियासाठी कालबाह्य झालेली आहे.आता ज्याची सत्ता त्याची मीडिया हे सूत्र बनले. भागवतांनी काय बोलावे आणि मीडियाने काय छापावे, हे आधीच ठरलेले असते. याला हवे तर आपण 'पेड न्यूज' म्हणू शकतो.सरकारी जाहिरातीच्या रूपात त्याची परत फेड केली जाते किंवा एखाद्या संपादकाला आमदारकी किंवा खासदारकी दिली जाते. म्हणूनच भागवतांचे कुठलेही भाषण बातमी मूल्य म्हणून बातमीच्या रूपात वर असते. हाच निकष संत रविदास जयंती निमित्त भागवतांनी केलेल्या भाषणाला लावण्यात आला. त्यामुळे ही बातमी देशात सर्वत्र पसरली. मुळात भागवतांना जाती पंडितांनी निर्माण केल्या आहेत याचा शोध आता का लागावा? हा प्रश्न आहे. भागवत ब्राह्मणी धर्मशास्त्राचे अभ्यासक आहेत. या धर्मशास्त्रांत जातीचा उल्लेख पानोपनी आला आहे. त्यांनी त्यांच्याच महापुरुषांची अनेक पुस्तके वाचली आहेत.इतकेच नाही तर त्यांचे आपले संपूर्ण आयुष्य ब्राह्मणांनी निर्माण केलेल्या संघटनांमध्ये खर्ची झाले. अशा ब्राह्मण वर्गातील शीर्षस्थस्थानी असलेल्या नेतृत्वाला जाती पंडितांनी निर्माण केल्यात, असा शोध उशिरा का लागावा? आपल्या सबंध आयुष्यात आजपर्यंत त्यांनी कोठेही जाती व्यवस्था, वर्णव्यवस्थे बाबत वाचले-ऐकले नाही, असे होत नाही. ही माहिती ब्राह्मणी वर्गातला शेंबडा आणि मंदबुद्धीचा ब्राह्मण सुद्धा सांगू शकतो. भागवतांनी ही नवी खेळी खेळून नवीन व्युहरचना आखली आहे, हे समजणे अतिशय आवश्यक आहे.

मोहन भागवत यांनी ब्राह्मण शब्द न उच्चारता पंडित शब्द उच्चारलेला आहे.पंडित आणि ब्राह्मण हे दोन वेगवेगळे शब्द आहेत. अलीकडे पंडित शब्दापेक्षा ब्राह्मण शब्द जास्त बदनाम झाला आहे. ब्राह्मणी भाषेत पंडिताला ज्ञानी, अभ्यासक असे म्हटले जाते. पंडित हा जातीवाचक शब्द नाही. मात्र ब्राह्मण हा जातीवाचक आहे. भागवतांनी ब्राह्मण हा शब्द उच्चारला असता तर समस्त ब्राह्मण वर्ग दोषी ठरला असता.त्यांच्या या शाब्दिक खेळीला आपण समजले पाहिजे. मोहन भागवत संघ संचालक झाले तेव्हापासून कायम वेगवेगळी विधाने करून चर्चेत आहेत.या पूर्वीच्या संचालकांनी अशी विधाने केली नाहीत असे नाही.त्यांनीही वेगवेगळ्या भूमिका घेतल्याचे नमूद आहे. हिंदू राष्ट्र, धर्म संसद, जातीव्यवस्था आणि धर्म शास्त्रांचा पुरस्कार त्यांनी केला आहे.मात्र त्याकाळी इलेक्ट्रॉनिक मीडिया एवढा प्रचलित नव्हता.आज भागवताचे कोणतही विधान हे प्रिंट मीडिया इलेक्ट्रॉनिक मीडियाची हेडलाईन बनते.

जातिव्यवस्थेच्या संदर्भात भागवत जे बोललेत काय त्यांना त्याचे प्रायशचित्त करायचे आहे? मुळीच नाही. त्यांना माहित आहे येथील मूलनिवासी बहुजन समाज हा जवळपास हजार हजार जातीत विभागलेला आहे. या सर्वांची टक्केवारी काढली तर ती ९०% आहे. सत्तेत यायचे असेल तर जनमत महत्त्वाचे आहे. संख्या महत्त्वाची आहे. ही संख्या आणि जनमत ज्या बाजूचे असेल त्या बाजूची सत्ता. हे भारतीय राजकारणाचे समीकरण आहे. या समीकरणाला अमलात आणायचे असेल तर विखुरलेल्या जातीचे समर्थन अनिवार्य आहे. यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत.

देशात अलीकडे जी सामाजिक ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू आहे या प्रक्रियेने सामाजिक आंदोलनाचे रूप धारण केलेले आहे.आपला शत्रू कोण, मित्र कोण? याची ओळख आता हळूहळू लोकांना होऊ लागली आहे. याचा धसका जसा प्रस्थापित राजकारण्यांनी घेतला तसाच आर्य ब्राह्मणांनी सुद्धा घेतला आहे. कारण या ध्रुवीकरणाचा फायदा बहुजन समाजाला होत असून आर्य ब्राह्मण आणि सत्ताकारण्यांसाठी ते फार मोठे आव्हान ठरत आहे. हे आव्हान परतुन लावण्यासाठी भावनिक मुद्दे उपस्थित करून आरएसएस आणि त्यांच्या प्रशाखा रात्रंदिवस कामाला लागल्या आहेत. बाबा,बापू, महाराज आणि राजकीय नेते विषारी प्रचार करित आहेत. ब्राह्मणांमध्ये धर्माची, जातीची डागडुजी करणारे असतीलही याबद्दल आम्हाला शंका नाही. परंतु ज्या धर्मात, ज्या जातीव्यवस्थेत विषमता आहे ती व्यवस्था उध्वस्त करणारा ब्राह्मण आजपर्यंत जन्माला आला नाही आणि पुढेही तो येणार नाही. या विषमतेवरच ब्राह्मणी आणि आताच्या हिंदू धर्माचा डोलारा उभा आहे.त्यामुळे त्यांच्याकडून असे क्रांतिकारी काम होणे शक्य नाही.म्हणूनच अभ्यास आणि अनुभवाअंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ब्राह्मणांमध्ये व्हॉल्टियर निर्माण झाला नाही.विषमतावादी ब्राह्मणी धर्मामुळे भारतीय मूलनिवासी लोकांना वेगळ धर्म स्वीकारला हा इतिहास आहे.

आपल्या वर्चस्वासाठी जसा ब्राह्मण सक्रिय आहे, तसाच समतावादी विचार स्थापित करण्यासाठी बहुजन सक्रिय आहे. ब्राह्मणी विचाराचा आधार कपट, विषमता कट, षडयंत्र, दैव, मोक्ष चमत्कार आहे. बहुजनांचा विचार प्रवाह मात्र मार्ग वेगळा आहे. सत्य,अनुभव आणि विज्ञान या कसोटीवर तो खरा उतरला आहे.म्हणूनच तो आजवर सक्षमपणे उभा आहे.मागील ७० वर्षात संविधानामुळे समतावादी विचाराचे पारडे जड झाले आहे.

शिक्षण,नोकरी आणि वैचारिक परिवर्तनामुळे बहुजन समाज सक्षम झाला आहे.त्याचा दुसरा परिणाम असा झाला की या समाजात स्वातंर्त्य, समता, बंधूत आणि न्याय ही मानवीमूल्ये रुजायला लागली. हे परिवर्तन ब्राह्मणी व्यवस्थेला आव्हान देणारे ठरत आहे. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक व्यवस्थेला त्यामुळे हादरे बसायला लागले आहेत.ही परिस्थिती मूलनिवासी बहुजन समाजासाठी सकारात्मक असली तरी यामुळे ब्राह्मणांचे आसन डोळ्याला लागले आहे. ते साबूत आणि आणि कायम टिकवण्यासाठी अशी विधाने करून समाजामध्ये भ्रम तयार केला जात आहे. त्यसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.हे आम्ही समजून घेतले पाहिजे.ब्राह्मणी कट कारस्थानाला बळी न पडता सदसद विवेकबुद्धीने आपण आपला मार्ग निवडला पाहिजे.त्यातच आपले, समाजाचे आणि राष्ट्राचे कल्याण आहे.

**जीवन गावंडे**
**७३५०४४२९२०**

### शिक्षकांना ३ दिवसांची विशेष रजा

हाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या रत्नागिरी अधिवेशनासाठी राज्य शासनाने १५ ते १७ फेब्रुवारी अशी तीन दिवसांची विशेष रजा शिक्षकांना मंजूर केली आहे.शनिवार व रविवारच्या सुट्टीला जोडून एकत्रित पाच दिवसांची सुट्टी मिळणार असल्याची माहिती शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष शंकर चव्हाण यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे वार्षिक अधिवेशन व शिक्षण परिषद रत्नागिरी येथील चंपक मैदानावर १७ फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# सत्यशोधक कवी नामदेवराव ठाकरे पाटील(वाई)



**सतीश जामोदकर**
**अखंड १२८,चंद्रावतीनगर,साईनगरजवळ अमरावती मो.९४२३३७४६७८**

वाई (लोहारा) हे छोटेसे गाव, जुन्या अकोला जिल्ह्यातून नवीन वाशीम जिल्ह्यात समविष्ट झालेले. कारंजा (लाड) या सुप्रसिद्ध शहराच्या पंधरा-वीस किलोमीटर अंतरावर वसलेले. एकदा मी कार्यक्रमाच्या निमित्ताने यागावी गेलो असता, चर्चेच्या ओघात धार्मिक विधी करताना ब्राम्हणांना बोलावू नये असे मत मी मांडले तेव्हा तेथील उपस्थित मंडळींनी सांगितले की आमच्या गावात ब्राम्हणाला न बोलविता बहुजन समाजातील मंडळीच धार्मिक विधी पार पाडीत असतात. याचे कारण विचारले असता कळाले की या गावात सत्यशोधक नामदेवराव पाटील होऊन गेले. त्यांनी जलशाच्या प्रमाणे लोकनाट्याचा वापर करुन लोकांचे प्रबोधन केले होते. गावाला शिक्षणाची गोडी लावली. एखाद्या आडवळणाच्या छोटयाशा गावातून स्वत:च्या मुलांना तर शिकविलेच पण सोबत गावातील दलित बहुजनांनासुद्धा शिक्षणासाठी प्रवृत्त केले. या छोट्याशा गावात जवळपास प्रत्येक घरात नोकरी करणारी व्यक्ती दिसते. या गावातील काही व्यक्तींनी शैक्षणिक संस्था स्थापन करुन शैक्षणिक कार्यात हातभार लावला आहे. वाशीम जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ/२१त्यामध्ये डॉ.श्रीकृष्ण खोलगडे, केशवराव खोपे, लक्ष्मणराव जवके व डॉ. मनोज सावळकर याशिवाय अनेक व्यक्ती मोठ्या पदावर कार्यरत आहेत.

उत्सुकतेने मी अधिक माहिती मिळते का यासाठी शोध घेणे सुरु ठेवले असता. काही नागरिकांनी संपर्क करुन त्यांच्याशी चर्चा करुन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. आजही नागरिकांच्या जीभेवर नामदेवराव पाटील यांची रचलेल्या रचना अक्षरक्षं रेंगाळत आहेत. असे दिसते मी व माझे मित्र चंद्रशेखर राऊत यांनी अनेकांची भेट घेतली. नामदेवराव पाटील यांच्यासोबत सहकलाकार म्हणून काम करणाऱ्यांचे नाव्य कळलीत. स्वत: नामदेवराव पाटील कवणे रचीत तर ब्राम्हण म्हणून सुद्धा काम करीत. शिवरामजी विठोबाजी ठाकरे हे विनोदी भूमिका करायचे. रघुनाथ रा.बोरीअरब नाच्याचे काम करायचा. अमृता महादेव पाध्ये न्हावी म्हणून काम करायचे, तर टवळी म्हणून बापुराव मारोती ठाकरे, पेटीवादक म्हणून रामभाऊ कर्णाजी ठाकरे आणि तब्बलजी म्हणून राजारामजी खुळे मास्तर (काज़ळेश्वर) ही मंडळी त्यांच्यासोबत काम करीत होती.

या गावात पंढरीनाथ पाटील चिखली (सत्यशोधक), दादासाहेब कोरडे यासारखे मोठे माणसे येथे येऊन गेल्याचे नागरिकांनी सांगितले. नामदेवराव पाटलांवर त्यांचा प्रभाव पडला. त्या प्रेरणेतून त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यास सुरुवात केली. त्यांचे कार्यक्रम केकत-उमराव (वाणी),ता.वाशिम, लोहारा, पोहा व काजळेश्वर इत्यादी ठिकाणी झाल्याचे पांडूरंगजी पाटील (न्हावी) यांनी सांगितले. नामदेवराव पाटील यांचा रानबोर नावाचा काव्यसंग्रह असल्याचे त्यांच्याकडून कळल्यावर शोध घेतला असता, तो घनश्यामजी ठाकरे यांच्या मिळाला. हा काव्यसंग्रह अनंत नामदेवराव पाटील, नामदेवराव पाटील यांचे चिरंजीव यांनी प्रकाशित केला. या काव्यसंग्रहाला लोककवी विठ्ठल वाशीम जिल्ह्यातील सत्यशोधक चयवळ/२२ वाघ यांनी प्रस्तावना लिहिलेली आहे.

अंदाजे १९०८ साली नामदेवराव पाटील यांचा जन्म झाला पांडूरंगजी आणि भगीरथीबाई यांचे हे धाकटे अपत्य, एका साधारण सुखी शेतकरी कुणबी कुटुंबात वाढलेले सातवीपर्यंतचे शिक्षण वाई व कारंजा (लाड) येथे झाले. नंतर त्यांनी नॉर्मल स्कूल अकोला येथून परीक्षा पास केली. परंतु शिक्षकाची नोकरी न करता त्यांनी घरची शेती पाहिली. नामदेवराव मुळातच हुशार होते. स्वत: कविता रचायचे आणि मुखपाठ म्हणून दाखवायचे. काही कविता त्यांची मुलगी सिंधू हिने लिहून काढल्या. त्यांचे वयाच्या १५ व्या वर्षी लग्न झाले. १० वर्षे त्यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य केले. सत्यशोधक समाजाचे काम करताना त्याच्या प्रचार-प्रसारासाठी नाटके लिहिली. आणि सादर सुद्धा केली. त्या लोकनाटकात स्वत: काम केले आणि गाणी गायीली व अनेक खेड्यात जाऊन लोकनाटकाचे प्रयोग केले. त्यांच्या मुलाने रानबोर या काव्यसंग्रहात एक आठवण सांगितली की, लोक विचारीत सत्यशोधक समाजाचे नामदेवराव पाटील तुमच्याच वाईचे का? असा प्रश्न लोक करीत असत. यावरुन त्यांची सत्यशोधक समाजातील कार्य लक्षात येते.

शिक्षणाविषजी त्यांना फार ओढ होती. आर्थिक परिस्थितीचा विचार न करता त्यांनी मुलांना शिक्षण दिले. शिक्षणासाठी शेती विकली. अस्पृश्यांसाठी काम करताना त्यांनी आपल्या वाडीतील विहिर महार-मांग यांच्यासाठी पिण्याचे पाणी भरण्यासाठी खुली केली. गावात अस्पृश्य वस्तीत जाऊन ते त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देत असत. त्यांच्या मुलांनी कधी त्यांना देवळात गेलेले किंवा पूजा-पाठ करताना पाहिले नाही.अशा सत्यशोधक कवीचा मृत्यू ८ डिसेंबर १९७९ रोजी झाला.त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाने ८ डिसेंबर १९९९ रोजी, त्यांच्या कवितेचा रानबोर नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित केला. काव्यसंग्रह वाचल्यानंतर त्यामधून नामदेवराव पाटील यांची सत्यशोधक शेतकरी वऱ्हाडी कवी म्हणून असलेली जातकुळी आपल्या लक्षात येते.

या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत विठ्ठल वाघ म्हणतात, नामदेवराव ठाकरेंच्या कविताचे बाड वाचून काढले तेव्हा वाटते अरे, ही तर वऱ्हाडची सोन्याची कऱ्हाड आहे.

विठ्ठल वाघांनी नामदेवराव पाटील यांचे नाव भाऊ भालेरावांच्या तोंडून ऐकले. भाऊ भालेराव म्हणत असत की, वऱ्हाडी लिहायची असेल तर नामदेवराव ठाकरेची कविता वाचा. विठ्ठल वाघ स्वत: लिहितात की, कवितेच्या प्रांतात नामदेवराव पाटील आपलाही बाप आहे. त्यांचे शब्द, यमक, अर्थगर्भता यामुळे त्यांची कविता डोळे दिपवून टाकते. मन उजळून टाकते.

नामदेवराव पाटलांचा शेतीवर जीव होता. म्हणूनच त्यांनी नोकरी न करता शेती केली. ते हाडाचे शेतकरी होते. शेतकऱ्यांचे दु:ख मांडणारा कवी म्हणजे नामदेवराव पाटील होय. त्यावेळी सुद्धा शेतकऱ्यांची परिस्थिती आजच्यापेक्षा वेगळीन नव्हती. नामदेवराव पाटील शेतकऱ्यांची कथा व व्यथा मांडतांना म्हणतात. कर्जाने हा बेजार झाला, नाही पैका उरला हाता विठ्ठल वाघ म्हणतात, एका हातात नागराची मुठ हाती घेऊन व दुसऱ्या हातात लेखणी घेणाा हा कवी सत्यशोधक समाजाच्या चळवळीतील कृतीशील कार्यकर्ता आहे. त्यामुळेच त्याला अधिक डोसळपणा जाणवतो. विठ्ठल वाघ त्यांच्या कवितेविषयी पुढे म्हणतात जोतीरावांनी गद्यातून जे मांडले तेच नामदेवराव ठाकरेंनी काव्यातून मांडले. पंढरीनाथ पाटील, नित्यानंद मोहिते पाटील यांच्यासारख्या सत्यशोधकांनी ब्राम्हण वर्चस्वातून साध्या-भोळ्या अंधश्रद्धाळू, जीवांची अन शेठ सावकारांच्या आर्थिक गुलागिरीतून गरीब कष्टकऱ्यांची मुक्ती असे दुहेरी साध्य त्यांनी ध्यानीमनी ठेवले. त्यांचे संस्कार पचवलेला कवीचा पिंड सुवर्ण भूमीकडे दृष्टी टाकतो, तेव्हा त्याला दिसणारे चित्र मोठे विपर्यास्त असते.

कर्जाखाली शेतवाडी गेली
सावकार जात नवीन बनली
भांडवलशाही पुष्ट बनली
जगणार कसा शेतकरी
अडवणूक नडली.

आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना त्यावेळची आणि आजची परिस्थिती वेगळी आहे का?. या प्रश्नाचे उत्त शोधतांना नाही हेच उत्तर मिळते. नामदेवराव पाटलांनी शेतकऱ्यांची दु:खे मांडली. त्यांच्या कविता गेयतापूर्ण होत्या. नामदेवराव पाटलांच्या कविता जशा प्रसिद्धी पराङमूख राहिल्या. तसे त्यांचे कार्यही अज्ञात राहिले.

सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीत ज्यांनी काम केले. त्यांनी ते खेडयापाड्यात पोहोचविले. त्यांचे कार्य अफाट होते. परंतु काहींच्या लेखनाचे मूल्यमापण झाले नाही. काहींना उच्चवर्णीयांकडून अनुल्लेखाने मारले गेले. तर काहींचे कार्य स्वकीयांची अनास्था व अज्ञान या कारणाने दुर्लक्षीत राहिले. अशा कितीतरी सत्यशोधकांचे कार्य काळाचा ओघात लोप पावले. परंतु आजही अशा सत्यशोधकी लेखकाच्या कर्याचे ठसे आपणास शोधण्याची गरज आहे.

# माझी कन्या भाग्यश्री योजनेतंर्गत ८४ मुलींना मुदत ठेव प्रमाणपत्र वितरीत



**गोंदिया:-** जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभागातंर्गत येत असलेल्या येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प गोंदिया ०१ च्या वतीने स्थानिय पंचायत समितीच्या सभागृहात माझी कन्या भाग्यश्री या योजनेंतर्गत पात्र ८४ मुलींच्या पाल्यांना मुदत ठेव प्रमाणपत्राचे वितरण(दि.१३)करण्यात आले.कार्यक्रमाला गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे आमदार विनोद अग्रवाल,गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुनेश राहांगडाले,महिला व बालकल्याण विभाग जि.प.सभापती सविताताई पुराम,अर्थ व बांधकाम विभाग सभापती योपेन्द्रसिंग (संजय) टेंभरे, समाजकल्याण सभापती पुजाताई सेठ,गोंदिया पंसचे उपसभापती निरज उपवंशी,गटविकास अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे,सहाय्यक गट विकास अधिकारी किशोर मुडे,पं.स.सदस्य शिवलाल जामरे,देवरी नगर पंचायतच्या नगरसेविका पिंकीताई कटकवार,बालविकास प्रकल्प अधिकारी नरेश पी. सोनटक्के,विशाल भोसले प्रामुख्याने उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या माझी कन्या भाग्यश्री योजनेंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्राचे मुदत ठेव प्रमाणपत्र यांमध्ये रू ५० हजार च्या मुदत ठेवकरीता ३ पात्र मुली व रू २५ हजारच्या एफडीकरीता ८१ पात्र मुलींचा समावेश होता. कार्यक्रमाचे संचालन विस्तार अधिकारी(सांख्यिकी)तिर्थराज ते. उके यांनी केले.प्रास्ताविक बाल विकास प्रकल्प अधिकारी नरेश पी.सोनटक्के यांनी केले.आभार अंगणवाडी बीट पर्यवेक्षिका कु. जी.डी.पंधरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अंगणवाडी बीट पर्यवेक्षिका सौ.सुनिता ए. दमाहे, सौ. शशिकला ए. तावाडे, सौ. दया बी. राऊत, सौ. गुलाब डी. पारधी, सौ. रमा वाय. बोरकर, सौ. ऊषा वाय. आगासे, कनिष्ठ सहाय्यक श्रीमती व्ही.एस.बारस्कर, परिचर श्रीमती के.आर. नागपुरे यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका सौ. कल्पना पटले, सौ.सुनिता पटले, सौ. ललिता बघेले, सौ.पुस्तकला बघेले, सौ. रेखा राहांगडाले, सौ. बबिता रामटेके, श्रीमती ऊषा लांजेवार, सौ. संगीता हेमने, सौ. पुष्पा दोनोडे, सौ. जनुका चौव्हान, सौ.लता बिसेन आदिंनी मोलाचे सहकार्य केले.

## एफ.सी. बायर्न महाराष्ट्र कप फुटबॉल क्रीडा स्पर्धा

**गोंदिया:** जिल्हा क्रीडा संकुल, गोंदिया येथे जिल्हास्तरीय एफ.सी. बायर्न महाराष्ट्र कप फुटबॉल स्पर्धेचे आयोजन दिनांक ७ व ८ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत करण्यात आले. सदर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, जिल्हा फुटबॉल संघटना सचिव खुर्शिद अन्सारी, निरज तिवारी व रवि नैताम उपस्थित होते. जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. राठोड यांनी खेळाडूंना सदर स्पर्धेची विस्तृत माहिती देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्या दिल्या. स्पर्धेबाबतच्या नियमांची माहिती रवि नैताम यांनी दिली.सदर स्पर्धेत १४ वर्षे आतील मुलांच्या ८ संघानी सहभाग घेतला. त्यात १२८ खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत नुतन विद्यालय गोंदिया या संघाने विजय संपादन केला. सर्व संघातील उत्कृष्ट खेळाडूंची पुढील निवड चाचणीकरीता निवड करण्यात आली असून त्यात अमान शेख, स्वरीत श्रीवास्तव, प्रणव नागदेवे, निहाल ठाकुर, यमन चाफले या खेळाडूंना वर्धा येथे होणा?या विभागीय स्पर्धेत निवड चाचणीसाठी सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

## प्रदूषणमुक्ती, निरोगी आरोग्यसाठी डोंगरगड सायकलवारी



**गोंदिया:** दिवसेंदिवस वातावरण बदलत आहे, ग्लोबल वॉमिंगचे संकेत मिळत आहे. याला कारण प्रदुषण आहे, या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी गोंदियातील काही युवकयुवतींनी ङ्कएक दिन सायकल के नामफ उपक्रम सन २०१७ साली सुरू केला. दर रविवार सकाळी १५ ते २० किमी सायकल चालवून प्रदूषणमुक्त व निरोगी आरोग्याचा संदेश देण्यात येत आहे. हे आता हा संदेश छत्तीसगड, मध्यप्रदेश राज्यातही पोहचावा या (उूलश्रश ठळवश) उद्देशा ने माँ बम्लेश्वरीचे धाम म्हणून प्रसिध्द छत्तीसगड राज्यातील डोंगरगड येथे मातृपितृ दिवसाचे औचित्त साधत मागील दोन वर्षापासून गोंदिया ते डोंगरगड सायकल वारी सुरू आहे. रविवार १२ फेब्रुवारी रोजी गोंदिया हुन ३० युवक-युवती सायकलने डोंगरगडसाठी रवाना झाले. वारीत १३ ते ८० वर्षा पर्यंतचे सायकलिस्ट सहभागी झाले आहेत. सन २०१७ पासून या अभियानातील दोन युवक अमन व शांती, निरोगी आरोग्य, प्रदूषणमुक्त भारतचा संदेश घेऊन हजारो किमीची यात्रा करून बाघा बॉडर जम्मू-काश्मीरपर्यंत पोहचले.

अभियानाचा महत्व जाणून अभियानाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. अभियानाच्या माध्यमा तून इंधन बचत, निरोगी आरोग्य व प्रदूषणापासून दूर होण्यासाठी शेकडो युवकांनी सायकल चालविण्यास सुरवात केली आहे.

रविवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास येथील जयस्तंभ चौकातुन ३० युवक-युवतींनी सायकलवारीचा प्रारंभ केला. आमगाव येथे तालुका पत्रकार संघ व खेतान मित्र परिवारातर्फे सालेकसा येथे सत्कार करण्यात आला.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात विस्तारित स्वरुपात "महाराजस्व अभियान"

सर्वसामान्य जनता आणि शेतकरी यांचा महसूल विभागाशी दैनंदिन संबंध येत असतो. दैनंदिन प्रश्न निकाली काढणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम आणि गतिमान होण्यासाठी महाराजस्व अभियान २६ जानेवारी ते ३० एप्रिल २०२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे... या अभियानाविषयी माहितीपर लेख..

राज्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात महसूल विभागामार्फत महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. भारतीय स्वातंर्त्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना महसूल विभागामार्फतही हा विभाग अधिक लोकाभिमुख आणि कार्यक्षम करण्यासाठी महाराजस्व अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत शेतक?यांना आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध सेवा देण्यात येणार असून या सेवा गतिमान पद्धतीने देण्यावर भर देण्यात येईल.

या विस्तारित स्वरुपातील अभियानात सर्व शेतकऱ्यांना घरी जाऊन शेतीचा सातबारा देणे आणि फेरफार निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा आणि फेरफार अदालतीचे आयोजन करणे, भूसंपादनाची गावपातळीवरील कमी-जास्त पत्रके अद्ययावत करणे आर्दीसह प्रमुख आठ बाबींचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे. या नवीन स्वरूपाच्या अभियानात बिगरशेती प्रकरणे गतीने मार्गी लावणे, पाणंद, शिवार रस्ते मोकळे करणे, गाव तेथे स्मशानभूमी, दफनभूमीसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी, निस्तार पत्रकाच्या नोंदी अद्ययावत करणे, ई-पीक पाहणी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी या महत्त्वाच्या आठ बाबींचा यात समावेश करण्यात आला आहे.

### महसूली सेवांची प्रभावी अंमलबजावणी

एका महिन्याच्यावर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे व त्याकरिता मंडळ मुख्यालयी फेरफार अदालत घेणे, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या विविध कलमांची कार्यवाही करणे, गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले गाडी रस्ते/ पाणंद/ पांधण/शेतरस्ते/ शिवाररस्ते/ शेतावर जाण्याचे मार्ग मोकळे करणे, मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ अंतर्गत मंजूर वहिवाटीचे रस्ते मोकळे आणि तयार करणे, गाव तिथे स्मशानभूमी/ दफनभूमी सुविधा उपलब्ध करुन देणे, लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच यासाठी प्रचार - प्रसिद्धी करणे, निस्तार पत्रक व वाजिब-उल-अर्जच्या नोंदी अद्ययावत करणे, सप्टेंबर २०२२ पर्यतची मोजणी प्रकरणे मार्च २०२३ पर्यत निकाली काढणे, ई-पीक पाहणी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे, ई - चावडी प्रणालीची अंमलबजावणी करणे, भूसंपादन अधिनियम, १८९४ अंतर्गत कार्यवाही करणे या घटकांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी तसेच अपर जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयापासून गावपातळीपर्यत प्रभावीपणे करण्यात येणार आहे.

### गौण खनिजासाठी कार्यपद्धती

याशिवाय परराज्यातून आणलेल्या वाळूचा साठा व निर्गतीबाबतची कार्यपद्धती निश्चित करणे, गौण खनिज ऑनलाइन प्रणाली वापराबाबतची माहिती देणे तसेच सन २०१६ चा महाराष्ट्र महसूल अधिनियमान्वये कुळकायद्याच्या कलम ६३ मधील सुधारणा करणे, पोटहिस्सा/सामीलिकरण/ भूसंपादन/रस्ता सेटबॅक इत्यादी कारणामुळे नकाशामध्ये होणा?या बदलाबाबत दुरुस्तीसह अद्ययावत नकाशा पुरविणे, नावीन्यपूर्ण योजना उपविभाग आणि तहसील कार्यालय येथे राबविणे महाराजस्व अभियानात घेण्यात आले आहे.

### प्रलंबित कामांच्या निपटाऱ्यासाठी कालबद्ध मोहीम

राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी महाराजस्व अभियानांतर्गत त्यांच्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा, तालुका आणि ग्रामपातळीवर केलेल्या कामगिरीबाबतची माहिती मासिक प्रगती अहवालाद्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील. तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख यांनी या अभियानांतर्गत त्यांच्या अधिनस्त कार्यालयात होणा?या कार्यवाहीचा आढावा शासनाला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महाराजस्व अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी अभियानात अंतर्भूत विविध लोकाभिमुख आणि प्रशासकीय घटकांच्या निपटाऱ्यासाठी कालबद्ध मोहीम आखून प्रलंबित कामांचा निपटारा करण्यावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी सर्व विभागीय आयुक्तांनी घटकनिहाय कालबद्ध कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित करुन व्यवस्थापन पथकाची स्थापना करुन सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अनुपालनाचे निर्देश देण्यात यावेत अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत.

### आधुनिकता आणि गतिमानतेला प्राधान्य

महाराजस्व अभियान अधिक व्यापक स्वरुपात राबविल्यामुळे महसूल विभागातील यंत्रणेमध्ये अधिक सुधारणा करून पारदर्शकता आणण्यास मदत होणार आहे. याशिवाय जमीन मोजणीची कामे अधिक गतीने आणि अचूकपणे होण्यासाठी मरोव्हरफ यंत्रे क्रांतिकारी ठरणार आहेत. तर ऑनलाइन यंत्रणेचा उपयोग अधिकाधिक केल्यामुळे महसूल विभागाचे काम अधिक गतिमान होण्यास मदत होणार असल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

### लोकोपयोगी उपक्रमांसाठी तंत्रज्ञानाचा वापर

ई-पीक पाहणी प्रकल्पाची अंमलबजावणी, ई-हक्क प्रणालीचा वापर, विसंगत सातबारा दुरुस्ती, प्रलंबित फेरफाराचा आढावा व उपविभागीय अधिकारी यांनी याबाबत घोषणापत्र देणे याबाबी पूर्ण करण्यावर भर देण्यात येईल. महाराजस्व अभियानामध्ये कार्यवाही करावयाच्या मुद्यांव्यतिरिक्त विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये लोकभिमुख आणि लोकोपयोगी कोणताही नावीन्यपूर्ण उपक्रम राबवायचा असल्यास ते या वर्षाच्या महाराजस्व अभियानामध्ये हाती घेऊ शकणार आहेत. त्या त्या भागातील गरज, भौगोलिक परिस्थिती, त्या भागानुसार वेगळे महसूली विषय इत्यादी याअंतर्गत ते राबविले जाऊ शकतात. जिल्हाधिकारी यांचा मासिक प्रगती अहवाल प्राप्त झाल्यानंतर विभागीय आयुक्त यांनी या अभियानाचा आढावा घेऊन तिमाही प्रगती अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे.

### शेतकऱ्यांना घरपोच सातबारा मिळणार

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात डिजिटल भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम, ई-महाभूमि अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या आज्ञावलीमधून संगणकीकृत डिजिटल स्वाक्षरीने प्राप्त होणा?या अधिकार अभिलेख विषयक गाव नमुना क्र. ७/१२ अद्ययावत करणे, तसेच गावातील खातेदारांना संगणकीकृत सातबारा घरपोच देण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. याबरोबरच एका महिन्याच्यावर प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढण्यावर भर देण्यात येत आहे. भूसंपादन केलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करण्यात येत आहे. यामध्ये संयुक्त मोजणी नकाशा आणि संयुक्त मोजणी पत्रक, भूसंपादन कायदा करुन ६ चे नोटिफिकेशन, अंतिम जाहीर निवाड्याची प्रत, भूमी संपादित जमिनीच्या ताबे पावतीची नक्कल, शेतसारा कमी करण्याबाबतचे आदेश, जमिनीचे सर्व्हे क्र. किंवा अन्य क्षेत्र वर्ग करावे लागत असल्यास तसे जमीन वर्ग केल्याबाबतचे जिल्हाधिकारी यांचे अभिहस्तांतरित आदेश याबाबत कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे,**
**विभागीय संपर्क अधिकारी (महसूल)**

# प्रतापगड यात्रेदरम्यान सर्व विभागांनी आपसात समन्वय ठेऊन कामे करावी-स्मिता बेलपत्रे

**गोंदिया :** अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील प्रतापगड येथे महाशिवरात्री निमित्ताने दरवषी यात्रा भरत असते. सदर यात्रेला भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यामुळे यात्रेदरम्यान गदीचे नियंत्रण करण्यासाठी सर्व विभागांनी आपसात समन्वय ठेऊन कामे करावी. अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी दिल्या.




प्रतापगड येथे यात्रेच्या अनुषंगाने पुर्वतयारी आढावा सभा घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जि.प.चे उपाध्यक्ष यशवंत गणवीर, तहसिलदार विनोद मेश्राम, गटविकास अधिकारी विलास निमजे, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, सहायक वनसंरक्षक दादासाहेब राऊत, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बी.डी.जायस्वाल व ग्रामपंचायत प्रतापगड सरपंच भोजराज लोगडे मंचावर उपस्थित होते.

प्रतापगड यात्रेच्या ठिकाणी कायदा व सुवस्था तसेच सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस नियंत्रण कक्ष व मदत केंद्राची व्यवस्था करण्यात यावी. नियुक्त करण्यात आलेले महत्वाचे अधिकारी/कर्मचारी यांचे मोबाईल क्रमांकासह यादी प्रदर्शित करावी. गदी नियंत्रणासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवावा. महत्वपूर्ण जागेवर सी.सी.टीव्ही कॅमेरे लावण्यात यावे. देवस्थानच्या जागोजागी पथदिवे लावण्यात यावे. यात्रेच्या ठिकाणी येणा?्या दुकानांमध्ये २० फुटाचा रस्ता मोकळा ठेवण्यात यावा, जेणेकरुन रुग्णवाहिका व अग्नीशमन वाहने येण्या-जाण्यासाठी मोकळी जागा मिळावी. प्रत्येक ५ दुकानांमध्ये १० फुटाचा अंतर राहणे अनिवार्य आहे.

यात्रेदरम्यान नियमानुसार व तरतुदीनुसार जिल्ह्यातील विविध तालुक्यातून बस फेरीची विशेष व्यवस्था करण्यात यावी. भाविकांना यात्रेत सहभागी होण्यासाठी नियोजीत जागेवर वाहन पार्कींगची व्यवस्था करण्यात यावी. यात्रेदरम्यान औषधोपचाराकरीता औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करुन ठेवावा. यात्रेच्या ठिकाणी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. यात्रेच्या ठिकाणी तात्पुरते शौचालय/मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात यावी. यात्रेच्या ठिकाणी येणा?्या नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच खाद्य पदार्थ



विक्रीच्या दुकानाची तपासणी करुन विषबाधेसारखे प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे भोजनदामध्ये शिळे अन्न देण्यात येऊ नये याबाबत विशेष काळजी घेण्यात यावी.

यात्रेदरम्यान भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. संबंधीत विभागानी आपआपली जबाबदारी व्यवस्थीतरित्या पार पाडावी. जर कोणी व्ही.व्ही.आय.पी. पाहुणे आले तर हेलिपॅडची पर्यायी व्यवस्था करुन ठेवावी. एक आपातकालीन पथक तयार करण्यात यावे. महिलांच्या गदी नियंत्रणासाठी निर्भया पथक ठेवण्यात यावे. असे निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी सांगितले.

यात्रेदरम्यान अधिकारी/कर्मचारी यांनी सेवाभावी वृत्तीने कामे करावी. रस्त्यावर दिशादर्शक सूचना फलक लावण्यात यावे. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करण्यात यावी. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची कुठलीही अडचण येणार नाही याची खबरदारी घ्यावी. विद्युत सेवा अखंडीतपणे सुरु राहील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. यात्रेदरम्यान कृषि विभाग, वन विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ, उमेद, नैसगीक आपत्ती व्यवस्थापन याबाबत माहितीपर स्टॉल लावण्यात यावे. असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यशवंत गणवीर यांनी सांगितले.

सभेला आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, जिल्हा साथरोग अधिकारी निरंजन अग्रवाल, बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता पी.एम.लांजेवार, विद्युत विभागाचे उपअभियंता ए.वाय. शहारे, सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, ए.आ.वि.प्र.चे प्रतिनिधी अरविंद जनबंधू यांचेसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डी.जी.दरवडे यांनी मानले.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये १३ हजार ८३७ प्रकरणांचा यशस्वी निपटारा

**पक्षकारांनी केले समाधान व्यक्त**



**गोंदिया:** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले समोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गोंदियाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोक अदालतमध्ये १३ हजार ८३७ प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात आला. यावेळी ५ कोटी ५० लाख ७३ हजार ४९२ रुपये एवढी वसुली झाली.

अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए.टी. वानखेडे, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस.व्ही. पिंपळे यांचे मार्गदर्शनाखाली ११ फेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया येथे तसेच जिल्हयातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये सर्वच प्रकाराच्या तडजोड पात्र न्याय प्रविष्ठ व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरीता तसेच विद्युत व बँक लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

लोक अदालतचे उद्घाटन न्या. ए.टी. वानखेडे यांचे हस्ते करण्यात आले. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस. व्ही. पिंपळे व अध्यक्ष, जिल्हा वकील संघ ॲड. सी.के. बडे यावेळी उपस्थित होते. ए.टी. वानखेडे यांनी लोक अदालतीचे फायदे व महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील एकूण न्यायालयात प्रलंबित दिवाणी ५१७ प्रकरणांपैकी ९९ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रूपये १,२६,६३,९७० वसुलींचे प्रकरणे निकाली निघाले. न्यायालयात प्रलंबित ३०२२ फौजदारी प्रकरणांपैकी १९३५ प्रकरणे निकाली काढण्यात आली व रूपये २,७०,२९,७७६ वसुलींचे प्रकरणे निकाली निघाली. तसेच लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेले पुर्वन्यायप्रविष्ठ ३९,१५५ प्रकरणांपैकी १२,६११ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रूपये १,५३,७९,७४६ रूपयांची वसुली झाली. एकूण ठेवलेल्या प्रकरणापैकी १३ हजार ८३७ प्रकरणे निकाली काढण्यात आली व एकूण रूपये ५ कोटी ५० लाख ७३ हजार ४९२ एवढी वसुली झाली.

त्याचप्रमाणे स्पेशल ड्राईव अंतर्गत जिल्हयातील न्यायालयामध्ये एकूण ६३५ फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी ५२१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. यामुळे ब-याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले आहे. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे विद्युत, पाणी, टेलीफोन, बँक रीकव्हरीचे पूर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबधित विभागाला जमा केली त्यांची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबधित विभाग व थकबाकीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याकरीता गोदिया येथे एन.डी. खोसे, तदर्थ न्यायाधिश-१ तथा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, एन.बी. लवटे, तदर्थ न्यायाधिश- २, तथा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, आर.एस. कानडे दिवाणी न्यायाधीश (व स्तर), ए.व्ही. कुलकर्णी, मुख्य न्यायदंडाधिकारी, श्रीमती वाय.आर. मुक्कणवार, कामगार न्यायाधीश, कामगार न्यायालय, गोंदिया, बी.बी. योगी, अध्यक्ष, जिल्हा तकार निवारण आयोग, गोंदिया, एस.आर. मोकाशी, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, व्ही.ए. अवघडे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पी.एन. ढाणे, २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गोंदिया, एम.बी. कुडते, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाय. जे. तांबोली, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी व जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सी.के. बडे, सचिव एस.आर. बोरकर व इतर

पदाधिकारी तसेच पॅनलवरील वकील ॲड. के.एस. आहुजा, ॲड. व्ही.एच. पांडे, ॲड. डी.एन डहाके, ॲड. आर.बी. पटले, ॲड. पी.डी. रहांगडाले, ॲड. ए.एम. सिददीकी, ॲड. एच.व्ही. डोंगरे, गोंदिया यांनी सहकार्य केले.

सदर लोकअदालतीचे यशस्वी आयोजनाकरीता आर.जी. बोरीकर, प्रबंधक, पी.पी. पांडे, अधिक्षक, एम.पी. पटले, सहायक अधिक्षक, विधी सेवा प्राधिकरण येथील आर.जे. ठाकरे, अधीक्षक ए.एम. गजापुरे वरिष्ठ लिपीक, सचिन एम. कठाणे, पी.एन. गजभिये, एस.डी. गेडाम, कनिष्ठ लिपीक तसेच बी.डब्ल्यू. पारधी, यु.पी. शहारे, बेलिफ, जगदिश पटले, पायल ठाकरे, पॅरा लिगल व्हांलटीअर्स व इतर न्यायालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# महिला आयपीएल लिलावासाठी गोंदियाच्या जान्हवीचे नाव



**गोंदिया:** स्थानिक मिस्टिक क्रिकेट अकादमीची खेळाडू जान्हवी रंगनाथनचे नाव आयपीएल लिलावासाठी निवडण्यात आले आहे.ती राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट स्पर्धेत जाणारी जिल्ह्यातील पहिली महिला खेळाडू ठरणार आहे.विशेष म्हणजे आज जान्हवीचे स्व.मनोहरभाई पटेल अकादमीच्यावतीने उत्कृष्ठ खेळाडू म्हणून सुवर्ण पदक देऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. लिलावाची यादी बीसीसीआयने जाहीर केली आहे.लिलावासाठी नोंदणीकृत १५२५ खेळाडूंपैकी ४०९ खेळाडू अंतिम झाले आहेत.२४६ भारतीय,१६३ परदेशी आणि ८ खेळाडू सहयोगी देशांचे आहेत. २०२ कॅप्ड खेळाडू आणि १९९ अनकॅप्ड खेळाडू आहेत, उर्वरित खेळाडू असोसिएट राष्ट्रांचे आहेत. पाच संघांना जास्तीत जास्त ९० स्लॉट उपलब्ध आहेत, त्यापैकी ३० परदेशी खेळाडूंठी आहेत.

लिलावात जान्हवीची मूळ किंमत १० लाख असून तिचा अष्टपैलू खेळाडूंच्या श्रेणीत समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती मिस्टिक क्रिकेट अकादमी गोंदियातर्फे उपेंद्र थापा यांनी दिली.मुलींसाठी सातत्याने मोफत प्रशिक्षण शिबिरे सुरू असून नुकतीच विदर्भस्तरीय आंतर अकादमी महिला टी-२० स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. जिल्ह्यात मिस्टिक्स क्रिकेट अकादमी क्रिकेटच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सतत कार्यरत आहे. प्रथमच जिल्ह्यातील एका खेळाडूचे नाव राष्ट्रीय स्तरावर अशाप्रकारे उदयास आले आहे, ही एक मोठी उपलब्धी आहे. जान्हवीने तिच्या यशाचे श्रेय तिचे कुटुंबीय आणि प्रशिक्षक उपेंद्र थापा यांना दिले.

# भंडारा-गोंदियाच्या वैद्यकीय महाविद्यालयांचा प्रश्न सुटणार

**गोंदिया-** भंडारा व गोंदिया जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरुहोऊन, त्या माध्यमातून डॉक्टर घडावेत आणि रुग्णांना चांगलीसेवा मिळावी, म्हणून खा. सुनील मेंढे यांचा सातत्याने प्रयत्न सुरू असून संसदेत हा विषय मांडला. गोंदिया येथील वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवेश दिला जात असला तरी संथ गतीने सुरू असलेले निर्माण कार्य चिंतेचा विषय आहे. सर्व सुविधांनी युक्त वैद्यकीय महाविद्यालय जिल्ह्याच्या सेवेत कधी येणार, असा प्रश्न खासदारांनी खा.सुनिल मेंढे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मांडवीय म्हणाले की, गोंदिया येथीलवैद्यकीय महाविद्यालयाला पहिल्या टप्प्यात मंजुरी देण्यात




आली असून महाविद्यालय निर्माणासाठी भू-संपादनाच्या कामाला तांत्रिकअडचणीमुळे उशीर झाला. त्यामुळे महाविद्यालयाच्या बांधकामास दिरंगाई होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यादरम्यान आरोग्य आणि कुटुंबकल्याण विभागाच्या केंद्रीय राज्य मंत्री भारतीताई पवार यांनी प्रस्तावित जागेला भेट सुद्धा दिलेली होती. सध्या प्रस्तावित जागेवर संरक्षणभिंतीचे बांधकाम पूर्ण झाले असून मुंबईला तातडीची बैठक लावून उर्वरीत काम लवकरच पूर्ण होईल. त्यासाठी लागणारा निधी राज्यशासनालाकेंद्राकडून पाठविण्यात आला आहे.भंडारा जिल्ह्यासाठी तिसऱ्या टप्प्यात वैद्यैयकीय महाविद्यालयाची घोषणा करण्यात आली. या संबंधी बोलतांना खा.मेंढेम्हणाले की, वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक असलेले मापदंड पूर्ण करण्याची क्षमता भंडारा जिल्ह्यात आहे. करिता लवकरात लवकरजनतेच्या सेवेसाठी वैद्यकीय महाविद्यालय होणे गरजेचे आहे. यावेळी उत्तर देतांना केंद्रीय आरोग्य मंत्री म्हणाले की, वैद्यकीयमहाविद्यालयाचा डीपीआर राज्यशासनाने तयार करून केंद्राकडे पाठविल्यास त्याला त्वरित मंजुरी देण्यासाठी कार्यवाही करणार असल्याचेसांगितले.

# २० फेब्रुवारीला महिला लोकशाही दिन

**गोंदिया :** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी २० फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनामध्ये सर्व महिला कर्मचारी, महिला मंडळ, बचतगट व इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येवून वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात. अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, खोली क्र.३६, जयस्तंभ चौक, गोंदिया या कार्यालयात नि:शुल्क प्राप्त होईल. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय गोदिया येथे संपर्क साधावा.

# योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रसार माध्यम प्रभावी-अनिल पाटील




**गोंदिया :** लोकशाहीचा चौथा स्तंभ या नात्याने योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठीची देखरेख प्रसार माध्यम ठेवत असतात. प्रसार माध्यमामुळे शासनावर व प्रशासनावर वचक राहतो. प्रसार माध्यम ही शासन आणि जनता यांच्या मधील दुवा आहेत. त्यामुळे शासनाकडून लोकांच्या अपेक्षा, योजनांची फलश्रुती या विषयावर प्रसारमाध्यम कार्यशाळेत चर्चा व्हावी, अशी अपेक्षा गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी व्यक्त केली.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या नागपूर येथील पत्र सूचना कार्यालय तसेच जिल्हा माहिती कार्यालय गोंदियाद्वारे आयोजित एक दिवसीय प्रसार माध्यम कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. माध्यम कार्यशाळेचे उद्घाटन आज अनिल पाटील यांच्या हस्ते हॉटेल गेटवे येथे झाले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, दैनिक भास्कर नागपूर आवृत्तीचे संपादक मानिकांत सोनी, जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते, पीआयबी नागपूरचे उपसंचालक शशीन राय, रायपूर दूरदर्शनचे सहाय्यक संचालक डॉ. मनोज सोनोने, सहाय्यक संचालक निकिता जोशी व सहायक संचालक हंसराज राऊत प्रामुख्याने उपस्थित होते.

केंद्र शासनाने गेल्या आठ वर्षात राबविलेल्या योजना लोकांपर्यत पोहोचवण्यात त्याचप्रमाणे या योजनांमध्ये राहिलेल्या त्रुटी शासनाच्या निर्दशनास आणण्यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाचे असते. शासन व प्रशासनाला आरसा दाखवण्याचे काम प्रसार माध्यम करतात. लोकशाहीचा चौथा स्तंभ या नात्याने योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठीची देखरेख सुद्धा प्रसार माध्यम ठेवतात. प्रसार माध्यमामुळे शासनावर वचक राहतो. त्यामुळे लोकांच्या शासनाकडून अपेक्षा, योजनांची फलश्रुती या विषयावर प्रसारमाध्यम कार्यशाळेत चर्चा व्हावी अशी अपेक्षा गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी व्यक्त केली. याप्रसंगी गोंदीयाच्या निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, दैनिक भास्कर नागपूर आवृत्तीचे संपादक मनिकांत सोनी, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, पीआयबी नागपूरचे उपसंचालक शशीन राय प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रानंतर पत्र सूचना कार्यालय मुंबईच्या सहाय्यक संचालक निकिता जोशी यांनी पत्र सूचना कार्यालयाच्या संदर्भात सादरीकरणाद्वारे माहितीपुर्ण विवेचन उपस्थितासमोर मांडले. या कार्यशाळेप्रसंगी आयुष्मान भारत योजनेच्या अंतर्गत कर्करोगावर उपचार घेतलेल्या गोंदियाच्या ढाकणी गावातील लाभार्थी बबीता दशराम त्याचप्रमाणे हृदयविकारावर उपचार घेणारे दिलीप तमाने या लाभार्थ्यांनी योजनेच्या लाभासंदर्भात आपले अनुभव उपस्थितांसमोर कथन केले.

या कार्यशाळेत प्रसारमाध्यम प्रतिनिधीकरिता तज्ज्ञ व्यक्तीतर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पाश्चात्य देशात बहुतांश मुद्रीत माध्यम बाजारीकरणाच्या दृष्टीने वृत्ताकंन करत असतांना भारतीय प्रसारमाध्यम परिवर्तनासाठी पत्रकारिता करतात. अशी सुरुवात गोंदिया सारख्या आदिवासी बहुल, खनीज संपन्न जिल्ह्यातून झाल्यास येथील प्रलंबित विकास प्रकल्प,समस्या यांना प्रसारमाध्यमातून वाचा फुटेल आणि परिवर्तन घडू शकते, अशी अपेक्षा दैनिक भास्कर नागपूर आवृत्तीचे संपादक मनिकांत सोनी यांनी ममुद्रीत माध्यमांची विकास संवादात भूमिकाफ या विषयावर बोलतांना व्यक्त केली .

पत्रकारांमध्ये समाजमन आणि राजकारण प्रभावित करण्याचे सामर्थ्य असते. आपल्या पत्रकारितेचा एक हिस्सा पत्रकारांनी समाज विकासासाठी देण्याचे आवाहन लोकमत समुहाचे वरिष्ठ संपादक विकास मिश्रा यांनी मविकास संवादामध्ये पत्रकाराची भूमिकाफ या विषयावर व्याख्यान देतांना केले. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांची दुर्गम भागात माहिती पोहोचवण्याची क्षमता प्रभावी असते, असे मत मइलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांची विकास संवादात भूमिकाफ यासंदर्भात बोलतांना दूरदर्शन रायपूरचे सहायक संचालक डॉ. मनोजकुमा सोनोने यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन गोंदीयाचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते यांनी केले. याप्रसंगी प्रसारमाध्यम प्रतिनिधींनीही आपले विचार व्यक्त केले आणि प्रतिसाद संकलनाने कार्यशाळेचा समारोप झाले.

# उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते पोलीस विभागाल्या मिळाल्या ४५ मोटार सायकल



**गोंदिया:-** राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज(दि.०९) आपल्या गोंदियाच्या एकदिवसी दौऱ्यादरम्यान गोंदिया पोलीस विभागाला जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मिळालेल्या ४५ मोटार सायकल बिरसी विमानतळावर आयोजित कार्यक्रमात हस्तांतरित केल्या. यातील ३७ वाहने ही “डायल ११२’ करिता व ८ वाहने पोलीस स्टेशनच्या कामांकरिता वापरली जाणार आहेत. पोलिसांच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ही वाहने उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी खासदार प्रफुल पटेल, जिल्हा परिषद अध्यक्ष पकंज रहांगडाले, गडचिरोली गोंदिया क्षेत्राचे पोलीस उपमहानिरिक्षक संदिप पाटील, पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील,अप्पर पोलीस अधिक्षक अशोक बनकर, आमदार विनोद अग्रवाल,आमदार विजय रहांगडाले,माजी पालकमंत्री डॉ.परिणय फुके,माजी आमदार गोपाल अग्रवाल, जिल्हा परिषद सभापती सोनु कुथे, गजेंद्र फुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.


**ग्रामपंचायत बोळदे/करड.**

**पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया**

**निविदा सुचना**

**निविदा क्र.१ जा.क्र.६ ग्रा.पं.बोळदे/करड. दिनांक १३/०२/२०२३**

ग्रामपंचायत बोळदे/करड. पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील कामाकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडीत केंद्र येथे सौर उर्जा पंप बसविणे | १५२५५३/- | १०० | अंदाजपत्रकीय किमतीच्य १ टक्के |
| २ | १५ वित्त पं.स.स्तर नाली बांधकाम | ३०००००/- | १०० | अंदाजपत्रकीय किमतीच्य १ टक्के |

१) वरील कामाचे कोरे निविदा फार्म दिनांक-१३/०२/२०२३ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २१/०२/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड.येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल. २) सदर कामाच्या निविदा मोहबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक १३/०२/२०२३ ते २१/०२/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरण्याची पावती मिळेल.३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक २२/०२/२०२३ ला ग्रामपंचायत बोळदे/करड.येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येईल. ४) सदर कामाची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**ग्रामसेवक** **सरपंच**

**ग्रामपंचायत बोळदे/करड.** **ग्रामपंचायत बोळदे/करड.**



**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.२ गोंदिया (दुरध्वनी क्र.०७१८२-२५००८४)**

**ई-निविदा सुचना क्रमांक ३०/२०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, सां.बां.विभाग, क्रं.२ गोंदिया हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक खात्याकडून सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता फक्त खालील कामाकरीता विहीत ब-१ (टक्केवारी पध्दतीने) नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच चिनिदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.२ गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.लक्षात) | इसारा रक्कम (रू.लक्षात) | ई-निविदा फार्म किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया जिल्ह्यातील अडयाळ दिघोरी नवेगांव चिचगड रस्ता रामा.क्रं.३५८ किमी.८०/०० ते ८०/५०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता.देवरी जिल्हा गोंदिया | ३०.०० | ०.०० | ५९०.०० |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- per e-tender Schedule uploaded on e-portal

ई-निविदा उघडणे :- ऑनलाईन नमुद केल्यानुसार वेळापत्रक रक्कम स्थळ ल.लागू व अंतिम राहील.

टीप :-

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील.

१.http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. कार्यकारी अभियंता सां.बां.विभाग क्रं.२ गोंदिया कार्यालयातील सुचना फलक.

३.सदर निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बहल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईडवरच प्रकाशित केल्या जाईल.

**कार्यकारी अभियंता**

**सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.२**

**गोंदिया**

जिमाका/गोंदिया/जाहिरात/६४/२०२३

# आता मराठीत मिळणार वैद्यकीय व अभियांत्रीकीचे शिक्षण-उपमुख्यमंत्री फडणवीस



स्व.मनोहरभाई पटेल यांची ११७ वी जयंती समारोह





**गोंदिया** : :देशाच्या व समाजाच्या विकासात तसेच शिक्षणाच्या क्षेत्रात स्व.मनोहरभाईनी केलेले कार्य अतुलनिय असे असून त्या काळात ठेवलेली शिक्षणाची लावलेले वृक्ष गोंदिया-भंडारा जिल्ह्यात वटवृक्षाच्या स्वरुपात बहरल्यानेच आज शिक्षणाची सोय त्याकाळी नसलेल्या जिल्ह्यामध्ये शिक्षित पिढी बघावयास मिळत आहे. शिक्षणाच्या चांगल्या सोयीमुळेच आज प्राविण्य श्रेणीत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा आपण सत्कार सुवर्णपदक देऊन करतोय हे खरे मनोहरभाईच्या कार्याचे फ ळ आहे.नवीन शिक्षण धोरणामुळे जागतिक शिक्षणाची दारे उघडली गेली आहे.राज्य सरकार सर्व वैद्यकीय अभियांभिकीसह उच्चतंत्र शिक्षणाचे अभ्यासक्रम मराठी भाषेत सुरु करण्याचे कार्य येत्या काळात करणार आहे.

देशाच्या मानव संशाधनात गाव खेड्यातील विद्यार्थ्यांचे योगदान त्यामुळे मोठे असणार आहे.राज्यात उद्योग व्यवसायात सर्वाधिक निवेश कर्ते असलेले सज्जनजी विदर्भातही निवेश करतील अशी अपेक्षा आहे.गडचिरोली सारख्या जिल्ह्यातील लोहखनीज वाहतूक करुन नव्हे तर त्याच ठिकाणी उपयोगी आणून स्टील उद्योग सुरू करण्यासाठी करार झाले.सोबतच इको सिस्टममुळे तिथे उद्योगाला चालना मिळणार आहे.पुर्व विदर्भात धानाचे शेती अधिक असल्याने या धानाच्या उत्पादनाकरीता कॉरिडॉर तयार करण्याची योजना असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले

देशात व राज्यात ज्या प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत, त्याचाच एक भाग म्हणून समृद्धी महामार्गाचा विस्तार गोंदिया पर्यंत केला जाणार आहे. नागपूर ते गोंदिया हे अंतर केवळ एका तासाचे असणार आहे. समृद्धी महामार्ग गडचिरोलीला सुद्धा घेऊन जाणार आहोत. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर व वर्धा लॉजिस्टिक कॉरिडॉर तयार करण्यात येणार असून याचा खूप मोठा फायदा धान उत्पादक व निर्यात करणाऱ्या शेतकऱ्यांना होणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. शिक्षण महर्षी स्व. मनोहरभाई पटेल जयंती व सुवर्ण पदक वितरण समारोह कार्यक्रमाचे उदघाटन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार प्रफुल पटेल होते. यावेळी मंचावर विजय दर्डा, उद्योगपती सज्जन जिंदल, चित्रपट अभिनेते जॅकी श्रॉफ,प्रदिप शाह, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले, आमदार सहसराम कोरेटे, आमदार मनोहर चंद्रिकापूरे, आमदार राजू कारेमोरे,आमदार अभिजित वंजारी, माजी आमदार डॉ.परिणय फुके, माजी खासदार डॉ खुशाल बोपचे, माजी आमदार नाना पंचबुध्दे, हेमंत पटले, राजकुमार बडोले, खोमेश्वर रहांगडाले, रमेश कुथे, गोपालदास अग्रवाल,बंडुभाऊ सावरबांधे, प्रकाश गजभिये, सेवक वाघाये, मधुकर कुकडे, केशव मानकर, दिलीप बनसोड, भेरसिंह नागपुरे, अनिल बावनकर, जि.प.अध्यक्ष पकंज रहांगडाले, उपाध्यक्ष यशवंत गणविर, राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष आमदार विद्या चव्हाण, गोंदिया शिक्षण संस्था अध्यक्ष श्रीमती वर्षाताई पटेल, माजी आमदार हरिहरभाई पटेल व प्रमुख मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थित होते.

गडचिरोलीला स्टील हब ऑफ इंडियाच्या रूपाने विकसित करण्याचा निर्णय आम्ही घेतला असून गुंतवणूक सुद्धा येत आहे. केवळ निर्यातच नाही तर उत्पादन सुद्धा गडचिरोलीत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमचे सरकार ज्या प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण करत आहे त्याचाच एक भाग म्हणून समृद्धी महामार्गाचा विस्तार गोंदिया पर्यत केला जाणार आहे.



धान उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने बोनस दिला असून यापुढे जाऊन धान उत्पादक शेतकरी जागतिक पुरवठा साखळीचा भाग व्हावा यासाठी येणाऱ्या काळात प्रयत्न करावे लागतील असे श्री. फडणवीस म्हणाले. आम्ही जी व्यवस्था निर्माण करीत आहोत ती निश्चितपणे यासाठी लाभदायक ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मनोहरभाई पटेल यांनी शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कार्य केले आहे. ज्यावेळी केवळ सहा ते दहा टक्के लोक साक्षर होते त्या काळात समाजाला पुढे न्यायचे असल्यास शिक्षणाची व्यवस्था करावी लागेल या ध्येयाने एकाच वेळी बावीस शाळा व दोन महाविद्यालय सुरू करून त्यांनी गोंदिया भंडारा जिल्ह्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळेच आज एक संपूर्ण पिढी शिक्षित झाली असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले. मनोहरभाई पटेल यांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले झाले असून या परिसरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे असे ते म्हणाले.

केंद्र सरकारच्या नवीन शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून एकविसाव्या शतकातील विकसित देश म्हणून भारत पुढे येत आहे. आज आपण जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलो आहोत लवकरच तिसऱ्या क्रमांकावर येणार आहोत. जगातील सर्वात चांगली अर्थव्यवस्था बनायचे असेल तर सर्वात महत्त्वाचे असते ते मनुष्यबळ आणि हे केवळ शिक्षण व कौशल्याच्या माध्यमातूनच तयार होते. या आधारेच आज आपल्याला जागतिक दर्जाचे मनुष्यबळ तयार करण्याची दार खुली झाली आहेत असे त्यांनी सांगितले.

गावातील मुलांना उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण किंवा वैद्यकीय शिक्षण त्यांच्याच भाषेत घेण्याची सवलत केंद्र सरकारने दिली आहे असे सांगून श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र सरकार उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण किंवा वैद्यकीय शिक्षण लवकरच मराठी भाषेत सुरूकरणार आहे. याचा अर्थ इंग्रजीचे महत्त्व कमी करणे नसून जी मुलं केवळ इंग्रजी येत नाही म्हणून उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण किंवा वैद्यकीय शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांना त्यांच्या भाषेत शिक्षण मिळणार आहे. यामुळे येणाऱ्या दिवसात देशाच्या मनुष्यबळ निर्मितीत सर्वात मोठे योगदान गावखेड्यातून आलेल्या तरुणाईचे असेल असेही त्यांनी सांगितले.

येत्या काळात गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्यासाठी उद्योगपती सज्जन जिंदल यांनी एक मोठा कारखाना या भागात उभारावा व दोन्ही जिल्ह्यातील युवकांची बेरोजगारी दूर करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

गोंदिया येथे विमानतळ असून फ्लाईंग स्कुल असल्यामुळे प्रशिक्षण घेऊन पायलट तयार होतात. त्यामुळे देशात गोंदिया जिल्ह्याचा नावलौकीक आहे. येत्या काळात गोंदिया व भंडारा जिल्ह्यात एक मोठा कारखाना उभारण्यात येईल असे आश्वासन उद्योगपती सज्जन जिंदल यांनी यावेळी दिले.

स्व.मनोहरभाई पटेल हे एक सामान्य घराण्यातून होते. १९५० मध्ये भंडारा जिल्ह्यात शिक्षण व सिंचनाची पाहिजे त्या प्रमाणात सुविधा नव्हती. त्या काळात मनोहरभाईनी भंडारा जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात व सिंचनासाठी आपले योगदान दिले. आजचे गुणवंत विद्यार्थी हे देशाचे आदर्श आहेत, असे विजय दर्डा यांनी सांगितले.

९ फेब्रुवारी ही स्व.मनोहरभाई पटेल यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात येत आहे. योगायोग असा की ९ फेब्रुवारी हा माझ्या वडिलांचा सुध्दा वाढदिवस आहे. विद्यार्थ्यांनी खुप परिश्रम घेऊन अभ्यास करावा. आपले आरोग्य सुदृढ राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी रोज सकाळी योगा केला पाहिजे. लग्न करणाऱ्या जोडप्यांनी पहिले आपली रक्त तपासणी केली पाहिजे. एक-दुसऱ्यांचा मान-सन्मान केला पाहिजे. देशाची सेवा करण्यासाठी युवकांनी आपले योगदान दिले पाहिजे, असे अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी यावेळी सांगितले.

स्व.मनोहरभाई पटेल यांनी एकाच दिवसात २२ शाळा सुरु केल्या व जिल्हा परिषदेला दान दिल्या. गोंदिया व भंडारा जिल्ह्यात सामाजिक, राजकीय क्षेत्रात आपला भक्कम पाया रोवलेले स्व.मनोहरभाई पटेल यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आदिवासी अति दुर्गम भागात प्रत्येकाला शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांना शिक्षण महर्षी म्हणून ओळखले जाते. गोंदिया व भंडारा जिल्ह्यासाठी स्व.मनोहरभाईनी अविरत प्रयत्न केले. गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यास आपण प्रयत्नशील आहोत. आपल्याला विदर्भाचा विकास करायचा आहे, त्यामुळे आपण सर्वजन एकत्र येऊन विदर्भाचा विकास करुया असे प्रफुल पटेल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

यावेळी सत्यार्थ-बोध ग्रंथाचे विमोचन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकूण १४ गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट पत्रकारितेसाठी देशोन्नतीचे भंडारा जिल्हा प्रतिनिधी चेतन भैरम, नवभारतचे जिल्हा प्रतिनिधी स्व.रमणकुमार मेठी, समाज-सेवेमध्ये उत्कृष्ट कार्य करणारे जुगलकिशोर अग्रवाल, ललित थानथराटे, देवेश मिश्रा. इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये उत्कृष्ट कार्य करणारे हरिष मोटघरे (गोंदिया) व शमशीर अब्दुल वहाब खान (भंडारा). जिल्ह्यातील प्रगतीशील शेतकरी टिकाराम गहाणे, स्वप्नील नंदनवार. उत्कृष्ट खेळाडू जान्हवी रंगनाथन, ज्योती गडेरिया यांचा स्वर्णपदक व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमास गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नागरिक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार माजी आमदार राजेंद्र जैन यांनी मानले.राष्ट्रगितांने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**हम आये तो चर्चा होती रहेगी, दूर तक भी जायेगी.लेकीन महाराष्ट्र मे हम राजनितीक लोग चुनाव के वक्त सिर्फ राजनिती करते है,बाकी वक्त तो हम सब दोस्त के रुप मे ही एकदुसरे के यहा आया जाया करते है.इसलिये हमारे आने की चर्चा और? भाईजी के मिलाप की चर्चा यहा ही नही तो वह तो उपर तक भी चलेगी असे म्हणत राजनिती को अलग रखकर व्यक्तीगत संपर्क से हम आपस मे मिलकर विचार व्यक्त करते रहते है.आगे भी रहेंगी,इसे कोई अन्यथा ना ले असे म्हणत उपस्थितांचे फडणवीसांनी लक्ष वेधून घेतले.**

## गोंडी नृत्य बघून पाहुणेही भारावले



**स्व.मनोहरभाई पटेल यांच्या ११७व्या जयंती कार्यक्रमाची सुरवात एम.बि.पटेल मिल्ट्री स्कुल, गोंदिया येथील पुर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करुन झाली.यावेळी खासदार प्रफुल पटेल,विजय दर्डा,सज्जन जिंदाल, वर्षाताई पटेल,राजेंद्र जैन आणि जॅकी श्रॉफ प्रामुख्याने उपस्थित होते. त्यानंतर मान्यवरांना मिलिट्री स्कुलच्या विद्यार्थ्यांनी परेड करुन सलामी दिली. त्यानंतर पंढरीबापू देशमुख विद्यालय, महागावच्या ३८ विद्यार्थ्यांच्या चमूने बिरसा मुंडा यांच्यावर आधारित गोंडी नृत्य सादर केले.हे नृत्य सादर झाल्यानंतर अभिनेते जॅकी श्राफ यांनाही मोह आवरता आला नाही,त्यांनीही बासुरीचे वादन करुन विद्यार्थ्यांसह नृत्याच्या आनंद घेतला.त्या विद्यार्थ्यांच्या आदिवासी वेशभुषा बघून त्यांच्यासोबत छायाचित्रही काढले आणि नंतर मुख्या कार्यक्रमाकरीता रवाना झाले.**

## शहरातील समस्यांना घेऊन काँग्रेसने केले पालिकेसमोर लक्षवेध आंदोलन

गोंदिया, ता. १४ : प्रशासकराज असलेल्या नगर परिषदेचे शहरातील समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. जागोजागी रस्ते फुटले आहेत. केरकच?याने नाल्या चोख झाल्या आहेत. डम्पींग यार्डचा प्रश्न अजूनही कायम आहे. अशा एक नव्हे, अनेक समस्या शहरात आ-वासून उभ्या आहेत. या समस्या घेऊन महिनाभरापूर्वी नगर परिषदेला घेराव घालण्यात आला होता. मात्र, अजूनही समस्या सुटल्या नाहीत. त्यामुळे शहर कॉग्रेस कमिटीने मंगळवारी (ता. १४) धरणे आंदोलन केले.

याउपरही नगर परिषदेने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. शहरातील प्रभाग क्रमांक दोन येथे पथदिव्यांची समस्या आहे. पाण्याची टाकी जीर्ण झाली आहे. मुलांना खेळण्यासाठी ग्रीन जीम नाही. प्रभाग क्रमांक तीन येथे गोंदिया पब्लीक स्कूलच्या मागील बोरवेल तीन महिन्यांपासून बंद आहे. कित्येक नाल्या चोख आहेत. प्रभाग क्रमांक चारमधील विवेकानंद कॉलनीस्थित पाणीटाकीच्या बाजूला नगर परिषदेची तीन एकर जमीन आहे. या जमिनीत नाल्याचे पाणी जमा होत असल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पथदिव्यांची सोय नाही. नाल्यावरील लहान पूल जागोजागी फुटला आहे. प्रभाग क्रमांक आठमधील सब्जी मंडीत अस्वच्छतेने कहर केला आहे. वाहतुकीचीही समस्या कायम आहे.

बोरवेलमधून दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगर परिषदेचे प्रशासक करणकुमार चव्हाण यांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात आली. मात्र, कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे नगर परिषदेच्या या कारभाराविरोधात शहर काँग्रेस कमिटीने धरणे आंदोलन केले.आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, जिल्हा उपाध्यक्ष अशोक गुप्ता, पी. जी. कटरे, अमर वराडे, विनोद जैन, आलोक मोहंती, बाबा बागडे, हरीश तुळसकर, अमर राहुल,रूपाली उके, मनीष चव्हाण, मंथन नंदेश्वर, चित्रा लोखंडे, पंकज पिल्ले, अरुण गजभिये, जितेश राणे, सोलंकी, सचिन मेश्राम, निलीमा शहारे, विष्णू नागरिकर, नंदा खापर्डे, भारत खापर्डे, रोहीत बोरकर, अनिल गौतम, सूर्यप्रकाश भगत यांच्यासह अन्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाला राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्तेचे मानांकन प्राप्त

### तीन पदविका अभ्यासक्रमांना तीन वर्षांसाठी नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशनचा दर्जा



**गोंदिया** : शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथील तीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाला नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन (NBA), नवी दिल्ली यांचे तीन वर्षांसाठी मानाकन प्राप्त झालेले आहे. वॉशिंग्टन एकॉर्ड (मान्यता संस्थांचे जागतिक संघ) अंतर्गत नियमाच्या आधारित असलेले हे मानांकन असून यूएस, यूके, कॅनडा, ऑस्ट्रेलियासह २९ देशांच्या बरोबरीने हे मानांकन देण्यात आलेले आहे. हे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याद्वारे अलीकडे प्राप्त झालेल्या उत्कृष्ट संस्था मानांकनच्या वरचे मानांकन आहे. २०२२-२०२५ या कालावधीत यंत्र अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञानातील या अभ्यासक्रमाना छ्इअ मानांकन प्राप्त झालेले आहे. ही नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन मान्यता ९ ते ११ डिसेंबर २०२२ दरम्यान देशा-तील सर्वोच्च विद्यापीठे/संस्थांच्या चार वरिष्ठ प्राध्यापकांचा समावेश असलेल्या तज्ञ समितीने केलेल्या तपासणीच्या आधारे देण्यात आले. अशी माहिती शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाचे प्राचार्य प्रा.(डॉ.) सी.डी.गोळघाटे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी डॉ. आर.एन.निबुदे, विभाग प्रमुख माहिती तंत्रज्ञान, डॉ. पी.एस.शर्मा, विभाग प्रमुख संगणक अभियांत्रिकी, प्रा. जी.एच.डाहोले, विभाग प्रमुख यंत्र अभियांत्रिकी, डॉ. जी.व्ही.गोतमारे, मुख्य NBA समन्वयक, प्रा. एन.एन.निकोडे, समन्वयक, विज्ञान आणि मानविकी, डॉ. हेमा भुसारी, TPO, प्रा. स्वप्नील अंबादे प्रामुख्याने उपस्थित होते.

शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया ही महाराष्ट्र राज्यातील विदर्भ विभागातील प्रमुख संस्थांपैकी एक असुन सन २००९ मध्ये स्थापन झाली. सुरुवातीला संस्थेची विद्यार्थी क्षमता २४० होती. सध्या संस्थेची वार्षिक विद्यार्थी क्षमता ३६० आहे. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सर्वोच्च व्यावसायिक मानकांसाठी सक्षम आणि वचनबद्ध असलेले प्रख्यात अभियंते विकसित करणे हे गोंदिया शासकीय तंत्रनिकेतनचे उद्दिष्ट आहे. संस्थेच्या स्थापनेच्या वेळेस यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. तदनंतर २०१४ मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी आणि विद्युत अभियांत्रिकी हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

आपला देश वॉशिंग्टन ॲकॉर्डवर पूर्ण स्वाक्षरी करणारा असल्याने, या यशामुळे विद्यार्थ्यांना भारतातील सवीच्च उद्योगांमध्ये तसेच वॉशिंग्टन ॲकॉर्डच्या इतर सदस्य देशांमध्ये रोजगार मिळवून देण्यास तसेच उच्च अभियांत्रिकी महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळण्यास मदत होणार आहे.

नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन द्वारे मान्यताप्राप्तीचा उद्देश महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर स्तरांवर, मान्यताद्वारे तांत्रिक शिक्षणा-तील उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणे आहे. NBA मान्यता प्रक्रियेद्वारे प्रदान केलेल्या गुणवत्तेच्या बाह्य पडताळणीचा सर्वच संस्था, विद्यार्थी, नियोक्ते आणि सामान्य जनतेला फायदा होतो. तांत्रिक शिक्षणातील उत्कृष्टतेला चालना देण्यासाठी NBA च्या विकासात्मक दृष्टीकोनाद्वारे प्रोत्साहित केलेल्या निरंतर गुणवत्ता सुधारण्याच्या प्रक्रियेचा देखील त्यांना फायदा होतो.

नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन हे तांत्रिक संस्थांच्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन विविध निकष आणि मापदंडांवर आधारित मूल्यांकन करते. यामध्ये संस्थात्मक दृष्टी, ध्येय आणि उद्दिष्टे, संस्था आणि प्रशासन, पायाभूत सुविधा, अध्यापन आणि शिक्षणाची गुणवत्ता, अभ्यासक्रमाची रचना आणि पुनरावलोकन, विद्यार्थ्यांची कामगिरी, शिक्षकांची कामगिरी, इतर सहाय्य सेवा जसे-ग्रंथालय, प्रयोगशाळा, उपकरणे, संगणक सुविधा इत्यादिंचा समावेश होतो. ज्यामुळे उद्योगाच्या गरजेनु-सार संस्थांनी तयार केलेल्या विद्यार्थ्यांना मदत होते .

नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशनने Outcome Based Education आधारित शिक्षण मॉडेल स्वीकारले आहे, त्याची कार्यपद्धती आंतरराष्ट्रीय मानका नुसार संरेखित केली. आउटकम बेस एजुकेशन हे कार्यक्रमाच्या शेवटी इष्ट परिणाम (ज्ञान, कौशल्य, वृत्ती आणि वर्तनाच्या दृष्टीने) साध्य करण्यासाठी लक्ष्य केले जाते. या जाणीवेने शिकवणे आणि संबंधित प्रयत्न करणे हे आउटकम बेस एजुकेशनचे उदिष्ट्य आहे. यामध्ये आउटकम बेस एजुकेशनची कार्यपद्धत निश्चित करण्यासाठी एक नियमित पद्धत समाविष्ट आहे.

संस्थेतर्फे राबविले जाणाऱ्या अभ्यासक्रमांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी संस्थेतर्फे ठोस प्रयत्न केले जात होते. शैक्षणिक गुणवत्तेची उच्च पातळी राखली गेली आहे याची खात्री करण्यासाठी नियमित शैक्षणिक अंकेक्षण (Audit) केले जाते. शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया ही पदविका श्रेणीमध्ये कामगिरी करणाऱ्या देशातील मोजक्या संस्थांपैकी एक आहे.

संस्थेने तंत्रशिक्षण संचालनालयाचे (DTE) संचालक डॉ.अभय वाघ, डॉ.विनोद मोहितकर, संचालक MSBTE, मुंबई आणि डॉ. एम.बी.डायगव्हाणे सहसंचालक, DTE, RO, नागपूर यांच्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथील प्राध्यापक व कर्मचारी यांनी NBA गुणवत्ता मानांकन प्राप्त करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## तृणधान्यांमधील पोषणतत्वाचे आहारात अनन्यसाधारण महत्व-हिंदुराव चव्हाण

- भारत सरकारच्या विकासाची ८ वर्ष व आंतरराष्ट्रीय पोषक धान्य वर्ष २०२३
- मल्टिमीडीया छायाचित्र प्रदर्शनाचा समारोपीय कार्यक्रम
- माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूरचा उपक्रम



**गोंदिया** : आहारात ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, कोडो, कुटकी, सावा, राजगिरा इत्यादी पौष्टिक तृणधान्याचा रोजच्या आहारात समावेश केल्याने आपले शरीर सुदृढ राहण्यात मदत होते. त्यामुळे तृणधान्यांमधील पोषणतत्वाचे आहारात अनन्यसाधारण महत्व आहे. असे प्रतिपादन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी केले.

माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय नागपूर, जिल्हा प्रशासन व जिल्हा माहिती कार्यालयाच्या सहयोगाने जयस्तंभ चौकातील प्रशासकीय इमारतीत आयोजित "भारत सरकारच्या विकासाची ८ वर्ष व आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३' या विषयावरील मल्टीमिडीया छायाचित्र प्रदर्शनाच्या आज समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते.

मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूरचे सहायक संचालक हंसराज राऊत, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, शिक्षणाधिकारी कादर शेख, नेहरु युवा केंद्राच्या युवा अधिकारी श्रृती डोंगरे, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर व बेरार टाईम्स वृत्तपत्राचे संपादक खेमेंद्र कटरे उपस्थित होते.

पश्चिम महाराष्ट्रात ज्वारी व बाजरीचे पीक मोठ्या प्रामाणात घेत असतात. जिल्ह्यात यावर्षी ५०० एकरमध्ये ज्वारीचे पीक घेणयात येणार आहे. आहारातील बाजरीचे तृणधान्यात जास्तीत जास्त ऊर्जा देणारे पीक आहे. यामुळे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रीत करते. मॅग्नेशिअम व पोटॅशिअमचा उत्तम स्त्रोत-रक्तदाब नियंत्रीत करण्यास मदत होते तसेच वजन नियंत्रीत करण्यास सुध्दा मदत होते. बाजरीमध्ये सल्फरयुक्त अमिनो आम्ल असल्यामुळे लहान मुले व गर्भवती मातांसाठी उपयुक्त आहे. यामुळे हिमोग्लोबीन वाढण्यास मदत होते. हृदयास सक्षम बनवते. मधुमेह व कॅन्सर रोधक असते. आपल्या शरिरातील हाडांना मजबुती देण्याचे काम करते. त्यामुळे जिल्ह्यात पौष्टिक तृणधान्य पिकांचा जास्तीत जास्त प्रचार-प्रसार करण्यात यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागाने पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादनात वाढ करणे, तृणधान्यांमधील पोषणमुल्यांमुळे त्यांचे आहारातील अनन्यसाधारण महत्व विचार घेऊन लोकांच्या आहारातील त्यांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने मुल्यवधीत उत्पादने तयार करणे अभिप्रेत असल्यामुळे रोजच्या आहारात पौष्टिक तृणधान्याचा वापर करा व निरोगी राहा अशी माहिती यावेळी देण्यात आली.

सदर प्रदर्शन १० फेब्रुवारी २०२३ पर्यत सकाळी १० ते रात्री ७ या वेळेत नागरिकांसाठी नि:शुल्क उपलब्ध आहे. या प्रदर्शनात कृषी विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ, आरोग्य विभाग, समाज कल्याण विभाग, महिला व बाल विकास विभाग आदी विविध विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले आहे. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती या ठिकाणी उपलब्ध असून जिल्ह्यातील नागरीकांनी मोठ्या संख्येने सदर प्रदर्शनीला भेट देऊन लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माहिती पत्रिकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

सदर प्रदर्शनी ८ फेब्रुवारीपासून गोंदिया येथील प्रशासकीय इमारतीत सुरु झाली असून प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. समारोपीय कार्यक्रमात उपस्थितांचे आभार नेहरु युवा केंद्राच्या युवा अधिकारी श्रृती डोंगरे यांनी मानले. कार्यक्रमास एन.एम.डी.कॉलेजचे विद्यार्थी व नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.